www.yuvakadhar.in E mail - dainikyuvakaadhar@gmail.com facebook : yuvakadhar

तरुणांचा बुलंद आवाज

दैनिक **युवक आधार** मराठी

दैं. युवक आधार करीता प्रतिनिधी नेमने आहे.
मुंबई, ठाणे नाशिक, रायगड , आलिबाग खोपोली ,पुणे , सांगली , सातारा ,कोल्हापुर, अहमदनगर, औरंगाबाद, बीड, नांदेड, शहर प्रतिनिधी नेमने आहे.
9220403509 संपर्क 9594509661
श्री.संतोष शिवदास आमले | श्री. सुरेश आत्माराम भोईर

मुख्य संपादक - सौ भारती संतोष आमले उपसंपादक - श्री.विलास मनोहर गायकवाड कार्यकारी संपादक - श्री.सुरेश आत्माराम भोईर निवासी संपादक - श्री. राकेश जनार्दन पाटील सह संपादक : मुकुंद कांबळे

वर्ष : २ अंक : १६६ वा रविवार दि. ०२ मार्च २०२५ किंमत : ४ रु पृष्ठ : ४ RNI MAHMAR/2023/89514


## आज पासून शनी देवाला ब्रँडेड तेलानेच करावा लागेल अभिषेक



## मेन गेट वरच कर्मचाऱ्यांकडून तेलाची तपासणी सुरू

**दैनिक युवक आधार**

**लखन वाल्हेकर नेवासा** :नेवासा तालुक्यातील श्री क्षेत्र शनी शिंगणापूर येथे शनी देवा ची स्वयंभू शिळेची झीज टाळण्यासाठी खाद्य तेल वापरावे असा देवस्थान ट्रस्ट च्या वतीने घेण्यात आलेला निर्णय आज दि.01 मार्च 2025 पासून सुरू केला आहे.

तसेच ज्या भाविकांच्या हातामध्ये ब्रँडेड कंपनीचे खाद्य तेल असेल अशाच भाविकांना आत मध्ये प्रवेश मिळणार आहे तसेच देवस्थानच्या मेन गेट वरच कर्मचाऱ्यांकडून तेलाची तपासणी करून घेतली जात आहे तसेच या नंतर शनी देवावर शुद्ध रिफाइंड खाद्य तेल च वापरावे असे देवस्थान चे अध्यक्ष यांनी सांगितले.

# असुरक्षित खड्ड्यांमुळे दुर्घटनेचा धोका

### नगरपालिकेच्या निष्क्रीयतेवर रहिवाशांचा संताप

**दैनिक युवक आधार**

**महाराष्ट्र प्रतिनिधी** : पाणी नसले तरी कर भरणे बंधनकारक? मात्र, कर वेळेवर भरूनही जर नागरिकांना पाणी टंचाईचा सामना करावा लागत असेल, तर त्याची भरपाई नगरपालिका कशी करणार? असा प्रश्न उपस्थित होत आहे. उरण शहरात उन्हाळा सुरू होण्याआधीच भीषण पाणी टंचाईचा सामना रहिवाशांना करावा लागत आहे. त्यामुळे अनेक सोसायट्यांना टँकरद्वारे पाणीपुरवठा करावा लागत आहे. पाण्याची मागणी वाढल्याने आणि उपलब्धतेत घट झाल्याने ही समस्या उद्भवली आहे. मात्र शहरात पुनर्विकासाच्या नावाखाली मोठ्या प्रमाणावर नवीन इमारतींचे बांधकाम सुरू आहे. त्यानंतरच पाणीपुरवठा अनियमित झाल्याचे परिणाम दिसून येत आहेत. उरण नगरपालिका प्रशासनाने मालमत्ता कर न भरल्यास पाणीपुरवठा खंडित करण्याचा इशारा दिला आहे. मात्र, कर वेळेवर भरूनही जर नागरिकांना पाणी टंचाईचा सामना करावा लागत असेल, तर त्याची भरपाई नगरपालिका कशी करणार? असा प्रश्न उपस्थित होत आहे.

शहरात पाणीटंचाईवर तोडगा काढण्यासाठी काही ठिकाणी खोदकाम करण्यात आले आहे. मात्र, 16-20 दिवसांपासून हे खड्डे उघडे पडून आहेत. बाजारपेठेसारख्या गर्दीच्या भागात मोठ्या खड्ड्यांभोवती कोणतीही



सुरक्षा व्यवस्था नाही. या खड्ड्यांमध्ये पडून एखादी दुर्घटना घडल्यास, जबाबदारी कोण घेणार? प्रशासनावर गुन्हा दाखल करावा, अशी नागरिकांची मागणी आहे. रहिवाशांच्या जीवाशी खेळणाऱ्या या भोंगळ कारभारामुळे नागरिक त्रस्त झाले आहेत. नगरपालिकेच्या निष्क्रीयतेवर रहिवाशी संताप व्यक्त करीत असून नगरपालिकेने त्वरित ठोस उपाययोजना करावी, अन्यथा नागरिकांना तीव्र आंदोलनाचा इशारा द्यावा लागेल, अशी भावना व्यक्त होत आहे.

सोसायटीच्या कमिटीने वारंवार नगरपालिका मुख्याधिकारी आणि पाणी पुरवठा अधिकाऱ्यांकडे तक्रार केली आहे. 15-20 दिवस उलटूनही समस्येवर उपाय न केल्याने रहिवाशांमध्ये तीव्र संताप आहे.मात्रया घटने पासून नगरपालिका कर्मचारीही अनभिज्ञ आहेत.

पाणीपुरवठा सुरळीत करण्या साठी काही ठिकाणी खोदकाम करून खड्डे मारण्यात आले आहेत. मात्र, अजूनही पाणी मिळत नसल्याने नक्की काय अडचण आहे, हे प्रशासनालाच समजत नाही. त्यामुळे हा पाणी प्रश्न मार्गी लागणे कठीण बनले आहे.

**पाणी नसले तरी कर भरणे बंधनकारक?**

मात्र, कर वेळेवर भरूनही जर नागरिकांना पाणी टंचाईचा सामना करावा लागत असेल, तर त्याची भरपाई नगरपालिका कशी करणार? असा प्रश्न उपस्थित होत आहे. उरण शहरात उन्हाळा सुरू होण्याआधीच भीषण पाणी टंचाईचा सामना रहिवाशांना करावा लागत आहे. त्यामुळे अनेक सोसायट्यांना टँकरद्वारे पाणीपुरवठा करावा लागत आहे. पाण्याची मागणी वाढल्याने आणि उपलब्धतेत घट झाल्याने ही समस्या उद्भवली आहे. मात्र शहरात पुनर्विकासाच्या नावाखाली मोठ्या प्रमाणावर नवीन इमारतींचे बांधकाम सुरू आहे. त्यानंतरच पाणीपुरवठा अनियमित झाल्याचे परिणाम दिसून येत आहेत. उरण नगरपालिका प्रशासनाने मालमत्ता कर न भरल्यास पाणीपुरवठा खंडित करण्याचा इशारा दिला आहे. मात्र, कर वेळेवर भरूनही जर नागरिकांना पाणी टंचाईचा सामना करावा लागत असेल, तर त्याची भरपाई नगरपालिका कशी करणार? असा प्रश्न उपस्थित होत आहे.

## एकाच कुटुंबातील दोन वेळा गाडी जाळणाऱ्या आरोपींचा शोध सुरू




**दैनिक युवक आधार**

**पनवेल, (वार्ताहर)** : पनवेल शहरात राहणाऱ्या एकाच कुटुंबातील दोन वेळा गाडी जाळणाऱ्या अज्ञात व्यक्तींचा शोध पनवेल शहर पोलीस करीत असून याबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास त्यांनी पनवेल शहर पोलिसांशी संपर्क साधावा असे आवाहन सुद्धा वपोनि नितीन ठाकरे यांनी केले आहे. या घटनेचे सीसीटीव्ही फुटेज पनवेल शहर पोलिसांच्या हाती लागले असून त्यामध्ये अज्ञात व्यक्ती या सदर ठिकाणी येवून त्यांच्या दोन्ही गाड्या वेगवेगळ्या वेळी जाळताना दिसत आहेत. तसेच त्यातील एकाने सदर कुटुंबाच्या घराचे फोटो रात्रीच्या वेळी काढल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे हे कुटुंब अत्यंत भितीच्या छायेच्या जगत आहेत. तरी याबाबत पनवेल शहर पोलिसांनी या व्हिडीओच्या माध्यमातून आवाहन केले आहे की, अशा प्रकारच्या व्यक्ती तुम्हाला पनवेल, कळंबोली, तळोजा, शिळ डायघर, कल्याण किंवा इतर भागात आढळून आल्यास त्यांनी तात्काळ पनवेल शहर पोलिसांशी संपर्क साधावा.

=================

## वाहतुकीचे नियम पाळा. ! हेल्मेट घाला अपघात टाळा...!

**दैनिक युवक आधार**

**महाराष्ट्र प्रतिनिधी** : दिनांक 25 फेब्रुवारी 2025 रोजी संपूर्ण उरण शहर परिसरात तसेच जासई गावा मध्ये उरण वाहतूक शाखेच्या वतीने वाहतुक नियमांविषयी जनजागृती अभियान रॅली काढण्यात आली होती, याप्रसंगी वरिष्ठ निरीक्षक वाहतूक विभाग उरणचे अतुल दहिफळे साहेब व त्यांचे सहकारी यांच्या मार्गदर्शनाखाली या रॅलीचे आयोजन करण्यात आले होते,सदरच्या रॅली मध्ये उरण व्यापारी असोसिएशन चे पदाधिकारी तसेच जासई गावातील ग्रामस्थांनी सहभाग घेतला होता.



**हेल्मेट घाला अपघात टाळा...!** वाहतुकीचे नियम पाळा अपघात टाळा....वाहनांचे इन्शुरन्स, पीयूसी, टॅक्स, वाहनांवर असलेले

> **उरण तालुक्यातील नागरिकांना जाहीर आवाहन**
> **मागील 2 महिन्या पासुन उरण तालुक्यात खुप मोठ्या प्रमाणात अपघात होऊन बरेचसे मोटार सायकल स्वार मृत्यूमुखी पडले आहेतया अपघाताचे व त्यातून होणाऱ्या मृत्यूचे प्रमाण कमी करण्या करीता जनतेला वाहतुक नियमांबाबत जनजागृती व्हावी म्हणून अश्या प्रकारचे उपक्रम यापुढे राबवले जाणार आहेत.**
> **अतुल दहिफळे**
> **पोलीस निरीक्षक उरण वाहतुक**

दंड इत्यादी गोष्टींवर मार्गदर्शन करण्यात आले, नादुरुस्त वाहने चालवू नयेत.रस्त्याच्या विरुद्ध दिशेने वाहन चालवू नयेत . दुचाकी वाहन चालविताना दोघांपेक्षा तिसरा व्यक्ती गाडीवर घेऊ नये, वाहन चालवत असताना मोबाईलवर बोलू नये, विनाकारण वाहने चालवून पेट्रोल डिझेलचा अपव्यय थांबवावा ,वाहतूक परवान्याशिवाय वाहन चालवू नये वेळोवेळी वाहनाची दुरुस्ती व देखभाल करून प्रदूषण विरहित वाहने चालवून निसर्गाचा ऱ्हास थांबवा. आशा अनेक मार्गदर्शनपर घोषणा देत, वाचून व सांगून यावेळी नागरिकांना सतर्क करीत या जनजागृती अभियानांतर्गत मार्गदर्शन करण्यात आले.

# दिव्यांगांसाठी रोजगाराच्या संधी

### राज्य शासनाचा महत्त्वपूर्ण उपक्रम !

**दैनिक युवक आधार**

**आसाराम विरकर । मुंबई** : मुख्यमंत्री ना. श्री. देवेंद्रजी फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली राज्य शासनाने दिव्यांग युवकांच्या सशक्तीकरणासाठी महत्त्वपूर्ण पावले उचलण्यास सुरुवात केली आहे. दिव्यांगांना आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी करण्याच्या उद्देशाने कौशल्य प्रशिक्षणाद्वारे त्यांना रोजगार आणि स्वयंरोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यावर भर दिला जात आहे. राज्यातील सर्व नोंदणीकृत दिव्यांगांना युडीआयडी (Unique Disability ID) देण्याचा महत्त्वाकांक्षी उपक्रम शासनाने हाती घेतला आहे. येत्या पाच वर्षांत या योजनेची अंमलबजावणी करण्यात येणार आहे. राज्य शासन आणि 'युथ फॉर जॉब्स' या संस्थेमध्ये लवकरच सामंजस्य करार होणार असून, या माध्यमातून दिव्यांगांना रोजगार आणि स्वयंरोजगाराच्या संधी उपलब्ध होतील. विशेष म्हणजे, विविध खासगी कंपन्यांच्या सहकार्याने राज्यभरात रोजगार मेळावे आयोजित करण्यात येणार आहेत.




दिव्यांगांना शासनाच्या विविध योजनांचा लाभ सहज मिळावा यासाठी त्यांचा अद्ययावत डाटाबेस तयार करण्याचे काम सुरू आहे. या उपक्रमाला स्थानिक स्वयंसेवी संस्थांचा देखील मोठा पाठिंबा मिळत आहे. समाजाच्या सर्वांगीण विकासाच्या दृष्टिकोनातून हा उपक्रम महत्त्वपूर्ण ठरणार असल्याचे प्रशासनाकडून सांगण्यात आले




**नवी मुंबई महानगरपालिका शाळा क्रमांक 47 रबाले येथील 200 पेक्षा जास्त मुलांना रस्ता सुरक्षा अंतर्गत व्यसनमुक्ती जनजागृती व्यसनमुक्त जीवन काळाची गरज सादरकरते श्री दिलीप किसनराव आमले आपला माणूस,वाहतूक नियमाची माहिती मा तुषार गुरव साहेब पोलीस निरीक्षक ,बाल सुरक्षा मार्गदर्शक मा भाऊसाहेब धस शाळेचे मुख्याध्यापक शिक्षक शिक्षिका तसेच मुलांना वाहतूक नियमाबाबत प्रश्न विचारून योग्य उत्तर देणाऱ्या मुलांना अंकिता मोटर ट्रेनिंग स्कूलच्या वतीने बक्षिसे वाटप करण्यात आली**

(छायाचित्र दैनिक युवक आधार )

## निफाड उगाव मार्गावरील तुळजा भवानी माता मंदिरात शनिवारी मध्यरात्री चोरी

**दैनिक युवक आधार**

**निफाड प्रतिनिधी । राहुल कुलकर्णी** : निफाड येथील भाविकाचे श्रद्धास्थान असलेल निफाड येथील उगाव रोडवरील तुळजा भवानी मातेच्या मूर्तीवरील चांदीचा टोप, आणि चांदीच्या पादुका या शनिवारी मध्यरात्री अज्ञात चोरट्याने चोरी केल्या.मंदिराचा लाकडी दरवाजाचे कुलूप तोडून मंदिरात प्रवेश करून ही धाडसी चोरी झाली.विषेश म्हणजे तुळजा भवानी मंदिर हे उगाव निफाड मार्गाच्या अगदी लगत आणि वस्ती असलेल्या ठिकाणी आहे.मंदिरात सी. सी. टीव्ही असून सुद्धा मंदिराच्या दरवाजाचे कुलूप तोडून चोरट्यानी चोरी केली आहे.या मंदिरात रोज सकाळ संध्याकाळ अनेक भाविक दर्शनाला येतात, रहदारीच्या ठिकाणी धाडसी चोरी झाल्याने नागरिक भयभीत आहे.मंदिराकडून निफाड पोलीस स्टेशनला फिर्याद देण्यात आली आहे.भवानी देवीचा मुकुट आणि पादुका या चोरणाऱ्याचा वेगाने तपास करावा अशी मागणी भक्त परिवाराने केली आहे.

# राशन दुकानातून मिळणारे धान्य जनावरे तरी खातात का हो साहेब?

### ज्वारी नेमकी कोणासाठी माणसासाठी की जनावरासाठी: नागरिकांचा संतप्त सवाल

**दैनिक युवक आधार**

**धर्माबाद प्रतिनिधी । गिरमाजी सुर्यकार** : रेशन कार्ड धारकांना स्वस्त धान्य दुकानातून मोफत धान्य वाटप केले जात असते. या महिन्यात वाटप करण्यात आलेल्या धान्यात ज्वारीचा देखील समावेश आहे. मात्र हि ज्वारी निकृष्ट दर्जाची असल्याने नेमकी ही ज्वारी माणसासाठी खायची आहे का जनावरांसाठी असा प्रश्न उपस्थित केला जात आहे.रेशन कार्डधारकांना वाटप करण्यात येत असलेल्या धान्यात चालू महिन्यात ज्वारीचे देखील वाटप करण्यात आले आहे. दरम्यान धर्माबाद तालुक्यात शासकीय स्वस्त धान्य दुकानात बीपीएल, एपीएल धारक गोरगरीब लाभार्थ्यांना अतिशय घाणेरडे व निकृष्ठ दर्जाची ज्वारी वाटप केल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला.

सध्यस्थिती धर्माबाद शहरामध्ये व तालुक्यात सर्व स्वस्त धान्य दुकानांमध्ये महाराष्ट्र शासनाकडून पुरवण्यात आलेल्या धान्याचे वाटप करण्यात आले आहे. त्यातील ज्वारी हे धान्य अत्यंत निकृष्ट प्रतीचे असून त्यामध्ये मोठ्या प्रमाणात जाळी लागलेले असून त्यातील ज्वारी ही काळपट व कीड लागलेली आहे. तसेच सदरील ज्वारीचा मोठ्या प्रमाणावर उग्र स्वरुपाचा वास येत आहे. त्यामुळे सदरील ज्वारी ही खाण्याचे लायक नसूनसुद्धा ती स्वस्त धान्य दुकानातून वाटप करण्यात येत आहे. सदरील निकृष्ट प्रतीचे धान्य वाटप करून शासन एक प्रकारे जनतेच्या जिवाशी खेळत आहेत. याबाबत संबधित स्वस्त धान्य दुकानदाराकडे विचारपूस व तक्रार केली असता ते सांगता की यात आमचा काहीही दोष नसून आम्हास जिल्हा पुरवठा अधिकाऱ्यांकडून तसेच धान्य येते. ते आम्ही वाटप करीत असतो. त्यामुळे यात आम्ही काहीच बदल करू शकत नाही. मात्र ही ज्वारी माणसासाठी खायची लायकीची नसुन ती जनावरे खायची आहे असा संतप्त सवाल नागरिकातून होत आहे



# जिल्हाधिकाऱ्यांनी केली घरकुलांची पाहणी



**दैनिक युवक आधार**

**नवीन पनवेल वार्ताहर** : किशन जावळे जिल्हाधिकारी तसेच जिल्हा दंडाधिकारी रायगड अलिबाग यांनी 26 फेब्रुवारी रोजी पनवेल येथील पोयंजे ग्रामपंचायत येथील कातकरी आदिवासी वाडी येथे प्रधानमंत्री जनजाती आदिवासी न्याय महा अभियान पीएम जनमन अंतर्गत झालेल्या घरकुलांची पाहणी केली.यामध्ये प्रामुख्याने जिल्हाधिकारी यांनी कातकरी वाडीतील सर्व सुविधांची बारकाईने पाहणी केली, यामध्ये घरकुलांचे आतील चटई क्षेत्र त्याचप्रमाणे दारे खिडक्या, यामध्ये शौचालयाला जोडलेला शोषखड्डा त्याचप्रमाणे वाडीला मिळणारे रोजचे पाणी याचा स्तोत्र तसेच वापराव्यात आणावयाच्या पाण्याचा स्तोत्र याचीसुद्धा बारकाईने पाहणी केली. त्याचप्रमाणे वाडीतील सर्व लहान मुले आबालवृद्ध व महिलावर्ग यांच्याशी रोजगाराविषयी चर्चा केली, यामध्ये कायमस्वरूपी रोजगार कसा निर्माण होईल याचीही चर्चा केली. या दौऱ्यामध्ये तेजस्वी गलांडे प्रकल्प संचालक पेण आदिवासी विभाग, माजी सरपंच जगदीश मते, ग्रामपंचायत अधिकारी धनंजय निकम उपस्थित होते. दौऱ्यामध्ये जावळे यांनी बऱ्याच बारीक-सारीक गोष्टींची नोंद घ्यावयास लावली. तसेच पोयंजे कातकरी वाडी ही पीएम जनमन मधील आदर्शवाडी करावी अशा सूचना दिल्या.

# गर्भाशयाच्या बाहेर रोपण झालेल्या दुर्मिळ कॉर्नुअल एक्टोपिक प्रेग्नन्सीवर यशस्वी उपचार

## खारघरच्या मदरहूड हॉस्पिटलमध्ये ३३ वर्षीय महिलेवर लॅप्रोस्कोपिक शस्त्रक्रिया करत टाळली जीवघेणी गुंतागुंत

**दैनिक युवक आधार**

**नवी मुंबई** : दुर्मिळ अशा गर्भाशयाच्या वरच्या भागात गर्भरोपण (कॉर्नुअल एक्टोपिक प्रेग्नेन्सी) झालेल्या ३३ वर्षीय महिलेवर खारघरच्या मदरहूड हॉस्पिटलमध्ये यशस्वी उपचार करण्यात आले. ही महिला सिझेरियन प्रसूतीनंतर अवघ्या सात महिन्यांतच पुन्हा गर्भवती झाली. या रुग्णाला गुंतागुंतीच्या गर्भधारणेचा इतिहास होता, ज्यामध्ये एक्टोपिक प्रेग्नन्सीचाही समावेश होता. योग्य तपासणी होईपर्यंत तिची दुर्मिळ अशी कॉर्नुअल एक्टोपिक प्रेग्नन्सी लक्षात आली नाही. प्रसूती व स्त्रीरोग तज्ज्ञ डॉ. सुरभी सिद्धार्थ यांच्या नेतृत्वाखालील टिमने वेळीच निदान निदान आणि लॅप्रोस्कोपिक शस्त्रक्रिया केल्याने रुग्णावर यशस्वी उपचार करता आले. यामुळे रुग्णाचा जीव वाचविणे शक्य झाले व गंभीर गुंतागुंत टाळता आली. नवी मुंबईत राहणाऱ्या ३३ वर्षीय श्रीमती हर्षाली श्रीनिवास पलसोडकर यांना २०२० मध्ये एक्टोपिक प्रेग्नन्सी राहिली होती, ज्यात एक फॅलोपियन ट्यूब काढून टाकण्यात आली होती. त्यानंतर तिला पुन्हा भविष्यात गर्भधारणा झाली व ते गर्भरोपण गर्भाशयात झाले असून तिने सी-सेक्शनद्वारे बाळाला जन्म दिला. या बाळंतपणानंतर अवघ्या सात महिन्यांनी तिला कळाले की ती पुन्हा गर्भवती आहे आणि त्यांनी डॉ. सुरभी सिद्धार्थ यांना भेट दिली. खारघर येथील मदरहूड हॉस्पिटलच्या प्रसूती व स्त्रीरोग तज्ज्ञ डॉ. सुरभी सिद्धार्थ सांगतात की, सात महिन्यांच्या प्रसूतीनंतर, रुग्णाला लक्षात आले की तिची मासिक पाळी आली नाही आणि गर्भधारणा चाचणीत ती गर्भवती असल्याचे निदान झाले. योनी आणि पोटाच्या सोनोग्राफी दरम्यान ही गर्भधारणा ओळखणे कठीण होते. अल्ट्रासाऊंडमध्ये देखील गर्भाशय किंवा फॅलोपियन ट्यूबमध्ये गर्भधारणा दिसून आली नाही, ज्यामुळे एक्टोपिक गर्भधारणा किंवा इतर गुंतागुंतीचा संशय आला. एक्टोपिक गर्भधारणेचे मूल्यांकन करण्यासाठी बीटा एचसीजी चाचणी करण्यात आली. एका आठवड्यानंतर वारंवार केलेल्या अल्ट्रासाऊंडमध्ये असे दिसून आले की गर्भधारणा गर्भाशयाच्या कॉर्नुअल भागात होती, जी गर्भधारणेसाठी एक अतिशय दुर्मिळ जागा आहे, विशेषतः त्याच बाजूला जिथे पूर्वी फॅलोपियन ट्यूब काढून टाकण्यात आली होती आणि कॉर्नुअल एक्टोपिक गर्भधारणेची निश्चिती झाली.गर्भाशयाच्या वरच्या भागात, फॅलोपियन ट्यूबजवळ, गर्भाचे रोपण होते तेव्हा दुर्मिळ अशी कॉर्नुअल एक्टोपिक प्रेग्नेन्सी म्हणून ओळखली जाते. ही गर्भधारणा जरी गर्भाशयाच्या बाहेर दिसत असली तरी ती गर्भाशयाच्या भिंतीच्या आत होते, ज्यामुळे ती ओळखणे अतिशय आव्हानात्मक होते. सर्व एक्टोपिक गर्भधारणेपैकी अंदाजे २ ते ४% प्रकणांमध्ये अशाप्रकारची गर्भधारणा होतें याचा अर्थ असा की २५०० पैकी १ आणि एकूण ५००० गर्भधारणेपैकी १ महिलेस अशा प्रकारची गर्भधारणा होते ज्यामुळे ती एक्टोपिक गर्भधारणेचा एक दुर्मिळ प्रकार ठरते.कॉर्नुअल एक्टोपिक गर्भधारणा बहुतेकदा फायब्रॉइड्स किंवा पॉलीप्स समजून त्याकडे दुर्लक्ष केले जाते. या प्रकरणात, फलित अंडी गर्भाधानानंतर कॉर्नुअल एक्टोपिक क्षेत्राकडे स्थलांतरित झाली. अशा गर्भधारणेत जास्त धोका असतो कारण जर गर्भधारणा खूप मोठी झाली तर ८-१० आठवड्यांनंतर मोठ्या रक्तवाहिन्या फुटू शकतात, ज्यामुळे गंभीर व अंतर्गत रक्तस्त्राव होऊ शकतो. रक्तवाहिन्या फुटल्याने होणारा रक्तस्त्राव हे मातामृत्यूचे कारण आहे. या रुग्णासाठी, गर्भधारणा वेळीच ओळखण्यासाठी आणि वेळेवर हस्तक्षेप करून कोणत्याही जीवघेण्या गुंतागुंती टाळण्यासाठी वारंवार फॉलो-अप चाचण्या, बीटा एचसीजी चाचण्या (रक्तातील मानवी कोरिओनिक गोनाडोट्रोपिन मोजण्यासाठी) आणि उच्च दर्जाची सोनोग्राफी करणे गरजेचे आहे असे माहिती डॉ. सुरभी सिद्धार्थ यांनी दिली.गर्भधारणा काढून टाकण्यासाठी आणि ती रोखण्यासाठी रुग्णावर लॅपरोस्कोपिक शस्त्रक्रिया करण्यात आली. शस्त्रक्रियेने कॉर्नुअल एक्टोपिक क्षेत्रातील गर्भधारणा यशस्वीरित्या काढून टाकण्यात आली ज्यामुळे संभाव्य रक्तस्त्राव आणि गुंतागुंत टाळता आली. ही शस्त्रक्रिया एक सुमारे एक तास चालली आणि गर्भाशय वाचविण्यात डॉक्टरांना यश आले. खारघर येथील मदरहुड हॉस्पिटलमधील डॉ. सुरभी सिद्धार्थ, डॉ. उज्ज्वल महाजन आणि डॉ. अनिता रॉय यांच्या मार्गदर्शनाखाली ही शस्त्रक्रिया यशस्वीरित्या पार पडली. डॉ. सुरभी सिद्धार्थ यांनी जागरूकता आणि नियमित तपासणीचे महत्त्व अधोरेखित करत, विशेषतः गुंतागुंतीच्या गर्भधारणेचा इतिहास असलेल्या महिलांसाठी. तुम्ही स्तनपान करत असलात किंवा नियमित मासिक पाळी येत नसली तरीही, जर तुम्हाला गर्भवती असल्याची शंका असेल तर गर्भधारणा चाचणी करणे आवश्यक आहे. स्तनपानादरम्यान होणाऱ्या हार्मोनल बदलामुळे बऱ्याचदा गर्भधारणेची लक्षणे दिसून येत नाहीत, त्यामुळे कोणत्याही असामान्य लक्षणांकडे दुर्लक्ष करु नका आणि गरज पडल्यास वैद्यकीय मदत घ्या. कॉर्नुअल एक्टोपिक प्रेग्नन्सीसारखे संभाव्य धोके वेळीच ओळखण्यासाठी नियमित फॉलो-अप, बीटा एचसीजी पातळीचे निरीक्षण करणे आणि अल्ट्रासाऊंड तपासणी करणे गरजेचे आहे.श्रीमती हर्षाली श्रीनिवास पलसोडकर यांनी त्यांचा अनुभव सांगितला, माझा गर्भधारणेचा प्रवास आव्हानात्मक राहिला आहे. २०२० मध्ये मला अनेकदा चक्कर येणे आणि तपासणी केल्यानंतर, नऊ आठवड्यात वाढलेल्या फॅलोपियन ट्यूबसह एक्टोपिक गर्भधारणेचे निदान झाले. पुढील महिन्यासाठी शस्त्रक्रिया नियोजित असली तरी, दुसऱ्या दिवशी माझी फॅलोपियन ट्यूब फुटली, ज्यामुळे त्वरित शस्त्रक्रिया करावी लागली आणि माझी डावी ट्यूब काढून टाकावी लागली. डिसेंबर २०२३ मध्ये मी अनपेक्षितपणे गर्भवती राहिली आणि ऑगस्ट २०२४ मध्ये माझ्या बाळाला जन्म दिला.डिसेंबर २०२४ मध्ये, मी पुन्हा गर्भवती राहिली, परंतु एचसीजी पातळी सकारात्मक असूनही अल्ट्रासाऊंडमध्ये गर्भधारणा कुठे विकसित झाली आहे हे शोधता आले नाही. डॉ. सुरभी यांचा सल्लामसलत घेत पुन्हा तपासणी करण्यात आली ज्यात एक दुर्मिळ कॉर्नुअल एक्टोपिक गर्भधारणेचे निदान झाले, ज्यासाठी त्वरित लॅप्रोस्कोपिक शस्त्रक्रिया आवश्यक होती. मदरहूड हॉस्पिटलमधील डॉक्टरांनी प्रसंगावधान राखत माझ्यावर उपचार केले त्यामुळे जीवघेणी गुंतागुंत टाळता आली. गर्भघारणेसंबंधी अगदी किरकोळ लक्षणांकडे देखील दुर्लक्ष करू नका असे मी प्रत्येक महिलेलाआवाहन करते.

नियमित अल्ट्रासाऊंड, एचसीजी चाचण्या आणि स्त्रीरोग तज्ज्ञांच्या सल्ल्याने वेळीच निदान केल्यास एक्टोपिक गर्भधारणेसारख्या गुंतागुंत जीवघेण्या होण्यापूर्वीच त्यांचे निदान करण्यास मदत होते.हे प्रकरण कॉर्नुअल एक्टोपिक प्रेग्नन्सीसारख्या दुर्मिळ आणि उच्च-जोखीम असलेल्या गर्भधारणेचे व्यवस्थापन करण्यासाठी लवकर निदान, नियमित तपासणी आणि तज्ज्ञांचा सल्ल्याचे महत्त्व अधोरेखित करते

**कॉर्नुअल एक्टोपिक प्रेग्नन्सी ही एक्टोपिक प्रेग्नन्सीचा एक असामान्य आणि धोकादायक असा प्रकार आहे जो गर्भाशयाच्या कॉर्नुआमध्ये विकसित होतो. कॉर्नुआ हा गर्भाशयाचा सर्वात वरचा कोपरा आहे, जिथे फॅलोपियन नलिका गर्भाशयाच्या पोकळीला जोडल्या जातात.**




## पनवेल तालुका प्रेस क्लब आणि लक्ष्मी चॅरिटेबल ट्रस्ट यांच्या संयुक्त विद्यमाने वाहतूक पोलिस व पत्रकार यांच्यासाठी मोफत नेत्र तपासणी शिबिर मोठ्या उत्साहात संपन्न



**दैनिक युवक आधार**

**पनवेल (प्रतिनिधी)** : रायगड प्रेस क्लब अंतर्गत पनवेल तालुका प्रेस क्लबच्या वतीने आज लक्ष्मी चॅरिटेबल ट्रस्ट आणि पनवेल तालुका प्रेस क्लब यांच्या संयुक्त विद्यमाने वाहतूक पोलिस त्याच बरोबर पत्रकार यांच्यासाठी मोफत नेत्र तपासणी शिबिर मोठ्या उत्साहात संपन्न झाले.या कार्यक्रमाच्या उद्घाटन प्रसंगी पनवेलचे आमदार प्रशांत ठाकूर, पनवेल महापालिकेचे आयुक्त मंगेश चितळे,सुप्रसिद्ध नेत्रचिकित्सक तथा मेडी. डायरेक्टर लक्ष्मी इन्स्टिट्यूट चे डॉक्टर सुहास हळदीपुरकर, वाहतूक शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक संजय पाटील, पनवेल शहराचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक नितीन ठाकरे,भाजपा उत्तर रायगड जिल्हा सरचिटणीस तथा नगरसेवक नितीन पाटील उपस्थित होते.वाहतूक पोलीस हे वर्षाचे बारा महिने अहोरात्र रस्त्यावर सेवा बजावत असतात.त्यांना स्वतःच्या प्रकृती कडे लक्ष देयला सुद्धा वेळ नसतो.तीच व्यथा ही समाजाचा चौथा आधारस्तंभ म्हणजे पत्रकार.त्यांना सुद्धा समाजात घडणाऱ्या प्रत्येक घडामोडी या सर्वसामान्यान पर्यंत पोहोचवायच्या असतात.त्यांचं सुद्धा स्वतः हा कडे लक्ष देयला वेळ नसतो. याचेच औचित्त साधून या शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.पनवेल तालुका प्रेस क्लब चा हा उपक्रम अतिशय स्तुत्य आहे अशी प्रशंसा आमदार प्रशांत ठाकूर यांनी केली. उन्हातानात काम करणारा वाहतूक पोलीस कर्मचारी हा नेहमीच दुर्लक्षित असतो. आणि त्याची काळजी पत्रकारांनी घेत अशा पद्धतीने उपक्रम राबवला त्याबद्दल पनवेल महापालिकेच्या आयुक्त मंगेश चितळे यांनी आपली प्रतिक्रिया दिली.वाहतूक पोलीस हे ऊन वारा पाऊस याची तमा न बाळगता रस्त्यावरती काम राहतो आणि त्याची दखल प्रत्येक जण घेतो असं नाही पण ही दखल पनवेल प्रेस क्लब ने घेतली त्याबद्दल वाहतूक पोलीस शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक संजय पाटील यांनी आपलं मत व्यक्त केलं.त्याच बरोबर नेत्र तपासणी शिबिराचा आयोजन केल्याबद्दल पोलीस आयुक्तांच्या तर्फे पनवेल शहराचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक नितीन ठाकरे यांनी पनवेल तालुका प्रेस क्लब चे आभार मानून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.सातत्याने असेच विविध कार्यक्रम प्रेस क्लबच्या माध्यमातून राबवण्याचा निर्धार या वेळी पनवेल तालुका प्रेस क्लबचे अध्यक्ष प्रशांत शेडगे यांनी वेळी व्यक्त केला.या वेळी मराठी पत्रकार परिषद अध्यक्ष मिलिंद अष्टीकर,विभागीय सचिव,मराठी परिषद कोकण विभाग मनोज खांबे,अध्यक्ष रायगड प्रेस क्लब प्रशांत गोपाळे , रायगड प्रेस क्लब चे माजी अध्यक्ष विजय पवार, अनिल भोळे,भारत रांजणकर, पनवेल तालुका प्रेस क्लब च्या उपाध्यक्ष तृप्ती पालकर,सरचिटणीस स्वप्नील दुधारे,कार्यध्यक्ष राजेंद्र पाटील,खजिनदार दत्तात्रय कुलकर्णी,जेष्ठ पत्रकार गणेश कोळी,संजय कदम तसेच नितीन कोळी,राकेश पितळे,सनी पांडे आणि सचिन भोळे उपस्थित होते.

# कुडामेडीच्या जागेवर पक्या घरांची पायाभरणी!

## चावणे खुटलवाडी येथे घरकुलांचे भूमिपूजन | आमदार महेश बालदी यांची वचनपूर्ती

**दैनिक युवक आधार**

**पनवेल /प्रतिनिधी** : माझ्या मतदारसंघांमधील एकही आदिवासी कुटुंब कुडामेडीच्या कच्च्या घरात राहणार नाही असे आश्वासन आमदार महेश बालदी यांनी दिले होते. त्यानुसार त्यांच्या संकल्प कृतीचा पहिला टप्पा म्हणून प्रधानमंत्री जनजाती आदिवासी न्याय महा अभियान योजने अंतर्गत चावणे ग्राम पंचायत मधील खुटलवाडी , पेरूची वाडी, सवणे वाडी आणि कालिवली आदिवासी वाडीत एकूण 137 घरकुल मंजूर झाले. शनिवारी या शब्दपूर्तीची बालदी यांच्या हस्ते पायाभरणी करण्यात आली.




गेल्या दहा वर्षांमध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी प्रत्येकाला स्वतःचे घर असावे यासाठी पंतप्रधान आवास योजना प्रभावीपणे राबवली. अन्न वस्त्र निवारा या मानवी गरज आहेत आणि प्रत्येक देशवासीयांच्या डोक्यावर निवारा असावा अशा प्रकारची भूमिका केंद्र सरकारने घेतली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली राज्य शासनाने सुद्धा याकरता सकारात्मक पाऊल टाकत मोठ्या प्रमाणात गोरगरीब गरजूंसाठी घरे बांधले आहेत. काही दिवसांपूर्वी पंतप्रधान आवास योजनेचा दुसऱ्या टप्प्यामध्ये मंजुरी पत्र आणि पहिला हप्ता देण्यात आला. पनवेल उरण परिसरामध्ये आजही मोठ्या प्रमाणात आदिवासी वाडे आहेत. लवकरच नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ टेकऑफ घेणार असताना या वाड्या पाड्यांवरील घरे पक्के असावेत यासाठी आमदार प्रशांत ठाकूर आणि आमदार महेश बालदी विशेष प्रयत्न करत आहेत.प्रधानमंत्री जनजाती आदिवासी न्याय महा अभियान योजना प्रभावीपणे राबवण्याचे काम या दोन्ही आमदारांनी केले आहे. चावणे ग्रामपंचायत हद्दीतील आदिवासी वाड्यांमध्ये एकूण 137 घरकुले मंजूर करण्यात आले आहेत. त्यासाठी आमदार म्हणून बालदी यांनी विशेष प्रयत्न केले. आदिवासी वाड्या पाड्यावरील घरांच्या स्वप्नपूर्तीची पायाभरणी 1 मार्च रोजी करण्यात आली.यावेळी प्रांत अधिकारी पवन चांडक,प्रकल्प अधिकारी आत्माराम धाबे, माजी जिल्हा परिषद सदस्य ज्ञानेश्वर घरत गट विकास अधिकारी समीर वाठारकर, सहाय्यक प्रकल्प अधिकारी प्रदीप सोळसकर ,विस्तार अधिकारी सांख्यिकी संतोष ठोंबरे , विस्तार अधिकारी पंचायत मीनल कनोजे, ग्रामपंचायत अधिकारी नलावडे,विभाग प्रमुख मंगेश वाकडीकर माजी सरपंच किरण माळी, विजय मिरकुटे, कार्यकर्ते संजय टेंबे, संदीप पाटील, दिनेश पाटील ग्रामपंचायत सदस्या ललिता दरवाडा आणि मोठ्या संख्येने आदिवासी घरकुल लाभार्थी व ग्रामस्थ उपस्थित होते.

आमदार महेश बालदी म्हणाले की आदिवासी कुटुंबाला पक्के घर असणे ही त्याची मूलभूत गरज आहे .प्रत्येक लाभार्थ्याने हे घर बनविताना विशेष लक्ष देऊन ते पूर्ण करावे. येत्या दोन महिन्यात काम पूर्ण करणार असाल तर माझ्याकडून वैयक्तिक ११००० हजारांची प्रति लाभार्थी मदत दिली जाणार असल्याची घोषणा केली. प्रकल्प अधिकारी आत्माराम धाबे यांनी आदिवासी विकास प्रकल्प पेण अंतर्गत राबविण्यात येणाऱ्या महत्त्वाच्या योजनांची माहिती दिली. विस्तार अधिकारी सांख्यिकी संतोष ठोंबरे यांनी घरकुल बांधकामाची प्रक्रिया लाभार्थ्यांना समजून सांगितली .यावेळी या कार्यात विशेष मेहनत घेऊन कार्यक्रम यशस्वी केल्याबद्दल सामाजिक कार्यकर्ते भगवान देशमुख आणि रत्नाकर घरत यांचा आमदारांच्या शुभहस्ते सन्मान करण्यात आला. प्रांत अधिकारी पवन चांडक यांनीही उपस्थितांना मार्गदर्शन केले.

## मुकी झाली वाचा

अंतरमनात दाटलेले भाव
जेंव्हा शब्दात उतरू लागतात
आमचेच श्वास आमच्याशी
जणू परक्यासारखे वागतात

मी कोण या शब्दांचा दर्जा ठरवणारा
पामर मी ,काय माझी बिशाद
विदारक सत्य तळाशी बसलेले
वेचतो मिळेल जे होऊन निषाद

शिखरावर विसावलेल्या भावना
होऊन वैरी ,प्राण घेती निर्दयी
मी जाळून नष्ट केले जयांना
पुन्हा जन्म घेतात माझ्याच हृदयी

कळेना कसे हे मान्य करावे
की माझ्यात अजून प्राण बाकी आहे
जगाने जणू निष्प्राण केला देह
बेगडी दुनिया, खोटी चकाकी आहे

मिटले डोळे, तोडले सारे बंध
संशय न उरला आणिक तो कशाचा
निशब्द झालो ,विरलो शून्यात आता
नका दोष देऊ ,मुकी झाली वाचा



पवन श्रीरंगसा कुसुंदल,
नांदेड

## स्वा.वि.दा सावरकर यांच्या आत्मार्पण दिन व मराठी भाषा दिनानिमित्त व्याख्यान व प्रतिमा पूजन संपन्न




**दैनिक युवक आधार**

**संतोष पुदाले । तुळजापूर धाराशिव** : नळदुर्ग येथे ब्राह्मण समाजाच्या वतीने स्वा.वि.दा. सावरकर यांच्या आत्मार्पण दिन व मराठी भाषा दिनानिमित्त भव्य प्रतिमा पूजन तसेच व्याख्यानाचा आयोजन केले होते मान्यवराच्या हस्ते पूजन करून पुणे येथील नारादिय व वारकरी कीर्तनकार व उत्तम वक्ते कु. पूर्वा शिवप्रसाद काणे यांनी स्वा.विनायक दामोदर सावरकर तसेच मराठी भाषा कुसुमाग्रज यांच्या साहित्य लेखन कविता व देशभक्ती व मातृभाषा याबद्दल सविस्तर मार्गदर्शन केले यावेळी छोट्या वक्त्यांसह डॉ.सिद्राम खजुरे कमलाकर चव्हाण गोपाळ कुलकर्णी बलभीम मुळे प्रणाली केसकर यांनी ही आपले मनोगत व्यक्त केले या कार्यक्रमात शहरातील मराठी शिक्षकाचा व नुकतेच शासकीय सेवेसाठी स्पर्धा परीक्षा यश प्राप्त करणाऱ्यांचा व सेवानिवृत्तांचा सन्मान करण्यात आला यामध्ये प्रणाली केसकर शुभांगी गायकवाड राज जगदाळेशुभदा जोशी जयश्री घोडके यांचा विशेष सत्कार आयोजित करण्यात आला होता कार्यक्रमचे अध्यक्ष म्हणून सेवानिवृत्त बलभीम मुळे हे होते तर प्रमुख पाहुणे म्हणून जवाहर विद्यालय अणदूरचे मुख्याध्यापक गोपाळ कुलकर्णी समाजसेवक डॉ खजुरे सर तलाठी सौ संध्या कुलकर्णी माजी नगराध्यक्ष उदय जगदाळे नितीन कासार कमलाकर चव्हाण बसवराज धरणे हे होते कार्यक्रमात मराठी भाषेला अभिजात भाषेला दर्जा मिळाल्याबद्दल मा. केंद्र शासनाचा अभिनंदनचा ठराव कमलाकर चव्हाण यांनी मांडला त्यास उदय जगदाळे यांनी अनुमोदन दिले स्वा.सावरकर यांना भारतरत्न पुरस्कार देण्यात यावा असा ठराव शिवसेना शहर प्रमुख संतोष पुदाले यांनी मांडला त्यास बसराज धरणे यांनी अनुमोदन दिले व तसेच नळदुर्ग शहरात स्वा सावरकर यांचे भव्य स्मारक करण्यात यावा असा ठराव नळदुर्ग ब्राह्मण समाजाचे अध्यक्ष विनायक अहंकारी यांनी ठराव मांडला त्यास सावरकर युवा मंच अध्यक्ष प्रमोद कुलकर्णी यांनी अनुमोदन दिले तिने ठराव मोठ्या संख्येने उपस्थित असलेल्या सावरकर प्रेमींनी एकमताने मंजूर केले यावेळी माजी नगरसेवक अमृत पुदाले सुधीर भैया हजारे महलिंग स्वामी संतोष पुदाले चिमाजी घुगे सरदार सिंग ठाकूर रमेश जाधव पत्रकार विलास येडगे दिपक जगदाळे दिपक काशीद सर श्रीकांत अणदुरकर तसेच नळदुर्ग शहरातील अक्षवेल महिला ग्रुप सर्व उपस्थित होते या कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रमोद कुलकर्णी सौरभ रामदासी यांनी केले या कार्यक्रमासाठी सर्व सावरकर प्रेमी उपस्थित होते या कार्यक्रमाचे आभार माजी नगरसेवक नळदुर्ग ब्राह्मण समाजाचे अध्यक्ष विनायक अहंकारी मानले ओके

## जनजागृती सेवा संस्था 'लोकमत एक्सलन्स अवॉर्ड' २०२५ ने सन्मानित



**दैनिक युवक आधार**

**मुंबई प्रतिनिधी । गुरुनाथ तिरपणकर** : गेल्या चार वर्षात जनजागृती सेवा संस्थेने उत्कृष्ट कार्य केलेले आहे.वृध्दाश्रम,बालकाश्रम,मतिमंद मुलांना मदत,आश्रमांना जीवनावश्यक वस्तूचे वाटप,कोरोना काळात गरीब गरजु व्यक्तींना मदत,तसेच आदिवासी पाड्यावर दिवाळी फराळ वाटप,कपडे वाटप,शिवजंयती उत्सव,डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती,महिला दिन,शिक्षक दिन,पत्रकार दिन,संस्थेचा वर्धापनदिन,महिला सक्षमिकरण,नवरात्रोत्सवात नवदुर्गांचा सन्मान,रक्तदान शिबिरात सहभाग,म्युझिक मंत्राच्या माध्यमातून सांस्कृतिक कार्यक्रम,वृक्षारोपण,स्वच्छता अभियान असे विविध समाजउपयोगी उपक्रम संस्थेने यशस्वीरित्या राबविले आहेत.गेल्या चार वर्षातील या उत्कर्ष कार्याची दखल लोकमत वृतपत्र समुहाने घेतली.आणि जनजागृती सेवा संस्थेची"लोकमत एक्सलन्स अवॉर्ड२०२५साठी निवड केली.कफपरेड येथील प्रेसिडेंट हॉटेल मधील आलीशान अशा प्रशस्त सभागृहात विधानसभेचे अध्यक्ष आदरणीय श्री. राहुलजी नार्वेकर,आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री प्रकाश आबिटकरजी उद्योग व मराठी भाषा मंत्री उदयजी सामंत यांच्या हस्ते"लोकमत एक्सलन्स अवॉर्ड२०२५हा संस्थेचे अध्यक्ष गुरुनाथ तिरपणकर यांना समारंभपूर्वक प्रदान करण्यात आला.याप्रसंगी संस्थेचे खजिनदार दत्ता कडुलकर हेही उपस्थित होते.तसेच लोकमत वृत्तपत्र समुहाचे वरीष्ठ अधिकारी उपस्थित होते.जनजागृती सेवा संस्थेने कणकवली,मालवण,चिपळूण,सावर्डे,कों डमाळा,मांडकी या ग्रामीण भागात तसेच कर्जत,वांगणी ,बदलापूर,अंबरनाथ,कल्याण,डोंबिवली,ठाणे,मुंबई शहर-उपनगर येथे विविध समाजउपयोगी उपक्रम राबविले आहेत.या सर्व ठीकाणी संस्थेचे कार्यकर्ते कार्यरत आहेत.त्यांच्या सहकार्या-यानेच कार्यक्रम यशस्वी करणे शक्य होत आहे.पुणे,बारामती,इचलकरंजी,यवतमाळ येथील संस्थाचे कार्यकर्ते कार्यक्रम घेण्यास उत्सुक आहेत.त्यांच्या बहुमोल सहकार्याने भविष्यात तेथे ही कार्यक्रम घेतले जाणार आहेत.जनजागृती सेवा संस्थेचे पदाधिकारी,सदस्य,सल्लागार तसेच जनजागृती सेवा संस्थेचे ग्रुप सदस्य यांचे मार्गदर्शन व सहकार्यामुळे उपक्रम राबविणे शक्य होत आहे.हा अवॉर्ड सर्वांचा आहे. म्हणून"लोकमत एक्सलन्स अवॉर्ड२०२५हा जनजागृती सेवा संस्था ग्रुप सदस्यांना समर्पित केला आहे असे संस्थेचे अध्यक्ष गुरुनाथ तिरपणकर यांनी आवर्जून सांगितले.अवॉर्ड मिळाल्याबद्दल संस्थेच्या पदाधिका-यांचे सर्वत्र कौतुक व अभिनंदन होत आहे.शेवटी लोकमत एक्सलन्स अवॉर्ड२०२५मिळाल्याबद्दल संस्थेचे अध्यक्ष गुरुनाथ तिरपणकर यांनी लोकमत वृत्तपत्र समुहाचे आभार मानले.

**दैनिक युवक आधार** (RNI NO :- MAHMAR/2023/89514) **हे पत्रक मालक, प्रकाशक भारती संतोष आमले तसेच मुद्रक करणसिंग प्रल्हादसिंग सिरसवाल यांनी सिद्धि प्रिंटर्स, मंगल नगर मलकापूर पिन ४४३१०१ जि बुलढाणा येथे छापून दैनिक युवक आधार मुख्य कार्यालय २०३ इंद्रप्रस्थ रेसिडेन्सी ग्रामपंचायत जवळ मु पो आदई ता. पनवेल जि रायगड ४१०२०६ येथून प्रकाशित केले आहे. संपादक भारती संतोष आमले.**

**daily YUVAK ADHAR (RNI NO :- MAHMAR/2023/89514) Printed by Karansingh Pralhadsingh Siraswal and published by Bharti Santosh Amle on behalf of Bharti Santosh Amle and printed at Siddhi Printers, MANGAL NAGAR MALKAPUR PIN 443101 DIST- BULDHANA. And Published at Head Office daily YUVAK ADHAR, INRAPRASTH SOCIETY, ? WING FLAT NO. 203-202 SERVE NO 28/1/ 3 PANVEL RAIGAD, ADAI PANVEL DIST-RAIGAD, Editor Bharti Santosh Amle**

# जिल्हा परिषद प्राथमिक शाळा आदर्श वाकी येथे वार्षिक स्नेहसंमेलन संपन्न



**दैनिक युवक आधार**

**छत्रपती संभाजीनगर** : जिल्हा परिषद प्राथमिक शाळा आदर्श वाकी येथे सालाबादप्रमाणे याही वर्षी स्नेहसंमेलन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आले. सर्व प्रथम छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्याचे पुजन शिवेश्वर संस्थानचे मठाधिपती नामदेव महाराज यांच्या हस्ते करण्यात आले.व उदघाटन करून कार्यक्रमाला सुरुवात झाली.जिल्हा परिषद प्राथमिक शाळेची एक अनोखी चांगली प्रथा असल्यामुळे गावांमध्ये आनंदाचे उत्सवाचा वातावरण पालकामध्ये तयार होते व आपल्या मुलांमुलींचा सांस्कृतिक कार्यक्रम मोठ्या उत्साहाने पाहतात. व बक्षीस देण्याची सुध्दा वर्षाव होत असतो. यामध्ये मराठी , हिंदी , पथनाट्य नाटीका ,असे भरपूर मनोरंजनात्मक कार्यक्रम आयोजित केला जातो.व कार्यक्रम सुरू झाल्यापासून तर शेवट पर्यंत कोणीही जागा सोडून जात नाही.हे एक विशेष आहे. तसेच शाळेचे मुख्याध्यापक व त्यांचे शिक्षक सहकारी खुप मेहनत घेऊन विद्यार्थ्यांचा सराव करून घेतात . यामध्ये डगळेसर, माटे सर, शिंदे सर, मोरे मॅडम, पल्हाळसर, यांनी मेहनत घेऊन स्नेहसंमेलन उत्साहात पार पडले. आदर्श वाकी गावचे सरपंच, उपसरपंच सदस्य पोलिस पाटील , शालेय समिती अध्यक्ष, उपाध्यक्ष ,तंटामुक्त समिती अध्यक्ष उपाध्यक्ष, सोसायटी चेअरमन, स्वच्छता समिती अध्यक्ष , उपाध्यक्ष ,सदस्य , माजी सैनिक व आजी माजी पदाधिकारी. गावातील प्रतिष्ठित नागरिक व पत्रकार मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# पत्नीने मुलगा व मित्रांच्या मदतीने पतीचा केला खून

**दैनिक युवक आधार**

**महाराष्ट्र प्रतिनिधी । प्रदीप पाटील** : दिनाक 23 फेब्रु वारी रोजी सकाळी 8:30 वाजण्याच्या सुमारास नवीन मुंबई विमातळ सर्विस रोड वरून येणाऱ्या खाडी पुलावर एका अनोळखी पुरुषाचा मृतदेह पडला असल्याचा संदेश मुख्य नियंत्रण कक्षा कडुन उलवा पोलीस ठाणेयेथे प्राप्त झाल्या नंतर येथील पोउपनीश्री देशमुख यानी पोलीस ठाण्यात आकस्मित मृत्यू क्र.16/2025 बी.एन.एस.एस.कलम 194 अशी नोंद करून घटना स्थळी जाऊन मृत देहाची ओळखपटविण्या कामी चौकशी सुरु केली.मात्र या घटनेने सारापरिसर हादरून गेला.

दरम्यान दुपारी 3:00 वाजण्याच्या पोलीस ठाण्या मध्ये रेश्मा सचिन मोरेव तिचा मुलगा विराज सचिन मोरे हे दोघे पती सचिन मोरे कालपासून मिसिंग असल्याची तक्रार देण्या साठी आले असता तिला अनोळखी इसमाचे फोटो दाखविले असता पती सचिन मोरे असल्याचे तिने ओळखले. चौकशीअंती ती समाधानकारक उत्तरे देत नसल्याचे पाहून पोउपनी श्री. देशमुख यांना संशय आल्याने त्यांनी अधिक चौकशी करण्यास सुरुवात केली.याकामी रेश्मा मोरे पोलिसांनी तिच्या मोबाईलचे सीडीआरव त्यांच्या राहात्या घराच्या इमारतीच्या सीसीटीव्हीचे फुटेजतसेच मृतदेहाच्या शवविच्छेदनाचा अहवाल यावरून मृत इसमाचा नाकतोंड दाबून खून झाल्याची खात्री पटल्याने पोउपनी श्री. देशमुख यानी त्यंच्या तक्रारी वरून पोलीस ठाण्यात गु.र.न.108/2025 भान्यास103(1),61(2) ,123अन्वये दि 26/02/2025 रोजी गुन्हा दाखल केला.

या संदर्भात पोलीस सूत्रांकडून देण्यात आलेल्या अधिक माहितीनुसार रेश्मा मोरे यांनी पती सचिन मोरे हा आपल्याला मानसिक व शारीरिक त्रास देत असल्याने त्यास घटस्फोट देण्यास सानितले होते.मात्र पतीने घटस्फोट देण्यास नकार दिल्यानेत्यंनी पतीस जीवे ठार मारण्याचे ठरविले. रेश्मा सचिन मोरे वय वर्षे (35)हिने तिचा मुलगा विराज सचिन मोरे वय वर्षे(16) तिचा मित्र रोहित टेमकर व रिक्षाचालक प्रथमेश म्हात्रेयाचा मदतीने कात रचून रोहित टेमकर यानी उपलब्ध करून दिलेल्या नशेच्या गोळ्या सची मोरे यास काल्र्याच्या जूस मध्ये टाकून पिण्यास दिल्या सचिन मोरे हा नशेच्या गुंगीत त्यास हॉस्पिटलमध्ये नेण्याचा बहाणा करूनउलवे ,डी.वाय.पाटील हॉस्पिटल नेरूळ, कळंबोली,एमजीएम हॉस्पिटल कामोठे उरण,जेएनपीटी परिसर इत्यादी भगत फिरवून जासई येथील शिवाजी महाराज पुतळ्या जवळ रिक्षा थांबवून पत्नी रेश्मा मोरे हिने सचिन मोरे याचा ओढनीने गळा आवळून खून केला व एखाद्या वहाना खाली फेकूनअप्गःत झाल्याचे दाखवावे अश्या उद्देशाने पुढे रिक्षा नेत असताना रिक्षा मधून फेकणे शक्य नसल्याने रिक्षा चालत असताना सचिन मोरे याचाश्वास सुरु आहे हे रेश्मा मोरे हिच्य लक्षात येताच तिने सचिन मोरे याचे नाकव तोंड दाबून जीवे ठार मारले व सदरच्या ब्रिज वर मुलगा व रिक्षाचालक याच्या मदतीने फेकून दिले.

या गुन्ह्यांतीलमुलगा विराज सचिन मोरे (16) यासबाल न्यायालय समोर केले आहे. कोठडी दिली आहे. तर आरोपी रेश्मा सचिन मोरेव तिचा मुलगा विराज सचिन मोरे रा.302 रेड्डीव्हिला सोसायटी प्लॉट नं.35,सेक्टर नं.23 उलवे तर प्रथमेश शरद म्हात्रे रा.404 बाळाराम रेसीडेन्सी आग्रोळीगाव सेक्टर नं 29 बेलापूर, रोहित अरविंद टेमकर रा. आग्रोळीगाव सेक्टर नं 29 या गुन्ह्यांतील तीनही आरोपींना अटक केली असून मा.न्यायालयाने त्यांना 5/3/25 पर्यंत पोलीस कोठडी दिली आहे. याकामी सदरची कारवाई उलवा पोलीस ठाण्याचे व.पो.नी.अर्जुन राजने,सं.पो.नी.सुरेश खरात,पोउपनी स्वप्नील शेळके, पोउपनी आशुतोष देशमुख,पोह्वा /2021 तांडेल. पोह्वा/4464 गोसावी,पोशी/12465 परदेशी पोशी/3203 काठुळे, पोशी/3791 रावळयांनी केली आहे.




# आष्टी येथे कैलास दहातोंडें यांचा सत्कार संपन्न



**दैनिक युवक आधार**

**बाळासाहेब रकटाटे । अंभोरा प्रतिनिधी** : महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक संघाच्या नवनियुक्त कार्यकारणी मध्ये राज्याच्या शिक्षक संघटनेच्या सरचिटणीस पदी नियुक्ती झाल्याबद्दल आष्टी तालुका शाखेच्या वतीने त्यांचा सत्कार करण्यात आला प्रसंगी सत्कार करताना आष्टी तालुक्याचे अध्यक्ष श्री संदीप खराडे सर ज्येष्ठ नेते श्री बाळासाहेब शेंदूरकर सर, माजी चेअZeeरमन सुरेश पवार सर विद्यमान चेअरमन श्री मारुती पठाडे सर, संचालक श्री विठ्ठल शिंदे सर संचालक श्री संजय काळे सर, संचालक श्री शिवाजी पांढरे सर, श्री सतीश शिंदे सर , श्री अशोक शिंदे सर श्री असलम शेख सर, श्री देविदास शिंदे सर श्री संतराम शिरसाट सर, उपाध्यक्ष श्री अशोक लटपटे सर, सचिव श्री महेश शिंदे सर, पिढी जगताप सर,श्री रंजीत वारे सर, श्री संदीप धोंडे सर श्री सिद्धेश्वर शेंडगे सर, श्री पत्रकार बाम पवार सर ,श्री कल्याण देसाई सर, श्री हरीश हातोटे सर ह भ प अम्रीत महाराज श्री संदीप गव्हाणे सर केंद्रप्रमुख श्री बिबीशन कवडे सर श्री पोपटराव काळे सर श्री रमेश भापकर सर श्री विलास मोरे सर श्री बापूसाहेब फसले श्री संतोष शेळके सर श्री दिलीप उडाणेसर, श्री निंबाळकर श्री संतोष पोकळे सर श्री दत्ता सर श्री नंदकुमार वाणी सर श्री म्हातारदेव शेळके सर, असंख्य शिक्षक शिक्षिका यांच्या उपस्थित सरांचा सत्कार समारंभ संपन्न झाला व त्यांना पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या.

# पनवेल मध्ये उ.बा.ठा, कॉँग्रेसला धक्का.!

## मल्लिनाथ गायकवाड, राहुल गोगटे, सुजन मुसलोंडकर शिवसेनेत



**दैनिक युवक आधार**

**पनवेल वार्ताहर** : विधानसभा निवडणुकांपासून शिवसेना शिंदे गटाची राज्यभर घोडदौड सुरू असून पनवेल मध्ये उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाचे उपशहरप्रमुख सुजन मुसलोंडकर, राहुल गोगटे यांनी महानगरप्रमुख प्रथमेश सोमण यांच्या नेतृत्वात मुक्तागिरी बंगल्यावर शिवसेनेत जाहीर प्रवेश केला. राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी स्वतः त्यांचे पक्षात स्वागत केले तर यापूर्वी म्हणजे १५ फेब्रुवारी रोजी कॉँग्रेस प्रदेश कमिटीचे उपाध्यक्ष व पनवेल मधील अनुभवी नेते श्री मल्लिनाथ गायकवाड यांनी भरत पाटील, सचिन गायकवाड, अशोक खरात यांच्या सह सोमण यांच्या पुढाकारात खासदार श्रीरंग आप्पा बारणे यांच्या वाढदिवसाच्या दिवशी शिवसेनेत जाहीर प्रवेश केला व २७ फेब्रुवारी रोजी राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची भेट घेतली. शिंदे यांनीही गायकवाड यांचे पक्षात स्वागत केले. यावेळी गायकवाड यांनी सिडको व सहकार क्षेत्राशी संबंधित विविध मागणी पत्र व निवेदने एकनाथ शिंदे यांना सादर केली. याच कार्यक्रमात महिला जिल्हा संघटिका रीना पाटील, विधानसभा संघटिका यशोदा गायकवाड, तालुकाप्रमुख मंदा जंगले यांच्या पुढाकाराने खारघर परिसरातील शेतकरी कामगार पक्ष व मनसेच्या लता टीके, इंदुताई वीर, सविता पाडेकर, आशा ठोमके, श्वेता पालवणकर, सुरेखा काळभोर, गौरी काथार, रितू मेश्राम यांसह धर्मवीर सेनेच्या प्रियांकाकडे यांच्या नेतृत्वात भारतीय जनता पक्षाच्या युवा मोर्चाचे पनवेल सचिव अक्षय साळवे यांनीही शिंदे यांच्या उपस्थितीत पक्षात प्रवेश केला विविध पक्षाच्या पदाधिकाऱ्यांनी केलेल्या प्रवेशामुळे शिवसेनेला निश्चित बळकटी प्राप्त होईल असे मत संपर्कप्रमुख श्री राजेंद्र यादव व डॉ. शिल्पाताई देशमुख यांनी व्यक्त केले.

# पत्रकारांना अरेरावी करणाऱ्या तुळजापूर तहसीलदारावर गुन्हा दाखल करून तात्काळ निलंबित करा



## पत्रकारांची मुख्यमंत्र्यांकडे मागणी

**दैनिक युवक आधार**

**विशेष वार्ताहर । संजीवकुमार गायकवाड । तुळजापूर** : दि. १.पत्रकारांना अरेरावी करून केबिन मधून हाकलून अपमान करणाऱ्या तुळजापूर जिल्हा धाराशिव तहसीलदार अरविंद बोळंगे यांच्यावर गुन्हा नोंद करावी अशी पत्रकारांनी मुख्यमंत्री यांच्याकडे मागणी केली आहे. 25 फेब्रुवारी रोजी तुळजापूर येथील तहसीलमध्ये अखिल भारतीय भ्रष्टाचार समितीचे वीना परवाना वीट भट्टीधारका विरोधी सामूहिक आत्मदहन आंदोलन होते.

ती बातमी संकलन व व्हिडिओ घेण्यासाठी पत्रकार गेले असता तहसीलदार अरविंद बोळंगे हे पत्रकारांना म्हणाले तुम्ही अगोदर बाहेर जा, शूटिंग करू नका,मला माहित आहे पत्रकार कसे असतात ते. असे म्हणून बाहेर हुस्कावण्याचा प्रयत्न केला व पत्रकारांना अपमानित केले.सदर आंदोलन तुळजापूर पीआय अनिल मांजरे यांच्या मदतीने स्थगित करण्यात आले.नंतर सर्व पत्रकार तहसीलदार यांच्या केबिनमध्ये गेले व म्हणाले आंदोलनाविषयी बाईट द्या (आपले म्हणणे सांगा) परंतु बाईट न देता पत्रकारांना अरेरावी करून पत्रकारांना केबिन मधून हाकलून दिले. अशाप्रकारे पत्रकारांच्या अधिकारावर गदा आणणाऱ्या मुजोर व कर्तव्यहीन,विटभट्टी धरकाबरोबर मिलीभगत असणाऱ्या तहसीलदार अरविंद बोळंगे यांना तात्काळ निलंबित करण्यात यावे अशा आशयाचे निवेदन जिल्हाधिकारी मार्फत मुख्यमंत्री,उपमख्यमंत्री, महसूल मंत्री, धाराशिव एस पी यांना देण्यात आले.शेवटी तात्काळ निलंबित नाही केल्यास सनदशीर मार्गाने महाराष्ट्राभर आंदोलन केले जाईल असा इशारा देण्यात आला. याची सर्व जबाबदारी प्रशासनाची असेल असे निवेदनात म्हटले आहे. निवेदनावर सौ सारिका चुंगे,श्री लहूकुमार शिंदे,आकाश हळकुंडे,राहुल कोळी,रुपेश डोलारे,गणेश कांबळे,संतोष दुधभाते,प्रवीण राठोड,मकबूल तांबोळी,हैदर शेख,चांद शेख, सलीम पठाण आदी पत्रकारांच्या सह्या आहेत.

# श्रेय वादांच्या लढाईतून झालेल्या खुनाचा वालचंदनगर पोलीस आणि पुणे ग्रामीण स्थानिक गुन्हे शाखेच्या पोलिसांनी 24 तासांत लावला छडा, 5 आरोपींना ठोकल्या बेड्या

**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी संतोष लांडे** : निरवांगी (ता. इंदापूर ) जवळील खून प्रकरणातील पाच आरोपींना वालचंदनगर पोलीस व पुणे ग्रामीण स्थानिक गुन्हे शाखेच्या पोलिसांनी कारवाई करीत अगदी शिताफीने 24 तासांच्या आतमध्ये जेरबंद करून अटक केली आहे. याप्रकरणी पोलिसांनी आठ जणांवर गुन्हा दाखल केला असून. यामध्ये राजेंद्र उर्फ राजू भाळे रामदास उर्फ रामा भोळे नाना भागवत भोळे (रा. सर्वजण खोरोची) शुभम उर्फ दादा आटोळे (रा. शेळगांव) स्वप्निल उर्फ बालाजी वाघमोडे (रा. रेडणी) या पाच आरोपींना अवघ्या 24 तासांमध्ये अटक केली आहे. हे आरोपी हैद्राबादला पळून जाण्याच्या तयारीमध्ये होते. या घटनेमध्ये उत्तम जालिंदर जाधव (वय 34 ) रा.खोरोची यांच्यावर उपचार सुरू असताना त्यांचा मृत्यू झाला. या आठ जणांनी मयत झालेले उत्तम जालिंदर जाधव यांच्यावर कोयता तलवारीने वार करून लोखंडी रॉडने तसेच पाय दगडाने घेतले होते. या घटनेची नोंद वालचंदनगर पोलिसांत झाली होती. वालचंदनगर पोलीस ठाणेचे सहाय्यक पोलीस निरीक्षक राजकुमार डुणगे यांच्यासह कर्मचाऱ्यांनी अगदी तातडीने तपासाला सुरुवात करून आरोपींना अटक करण्यासाठी पोलीस पथके रवाना केली होती. 24 तासांच्या आतमध्ये वालचंदनगर पोलीस आणि पुणे ग्रामीण स्थानिक गुन्हे शाखेच्या पोलिसांनी आरोपींना पोलिसांनी बेड्या ठोकल्या आहेत. पुणे ग्रामीणचे पोलीस अधीक्षक पंकज देशमुख अप्पर पोलीस अधीक्षक गणेश बिराजदार उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ. सुदर्शन राठोड यांनी वालचंदनगर पोलीस ठाणेचे सहाय्यक पोलीस निरीक्षक राजकुमार डुणगे यांच्यासह कर्मचाऱ्यांचे या कामगिरीबद्दल विशेष कौतुक केले




# गायिका उषा वारगडा यांचा ई-मेल व युट्यूब चॅनेल हॅक केल्याने पोलीस ठाण्यात तक्रार दाखल

**दैनिक युवक आधार**

**पनवेल / प्रतिनिधी** : आदिवासी समाजातील सामाजिक कार्यकर्त्या आणि गायिका उषा गणपत वारगडा यांचा ई-मेल आय.डी. गुरुवार (दि. २७ फेब्रु.२५) रोजी पहाटे ३.०० वाजेच्या सुमारास हॅक केला होता. सकाळी उठल्यानंतर नेहमीप्रमाणे युट्युब चॅनेलला गाणी लावत असता अकॉउंट डिसाब्लेड झाल्याचे दिसून आले. तेव्हा युट्युब चॅनेल हाताळणारा मावस भाऊ कैलास मेंगाळ आणि मच्छिंद्र वाघ या दोघांनाही सांगितले.



परंतु, तोपर्यंत हॅकरने ई-मेलचा रिकवर असणारा मोबाईल नंबर हठवून हॅकरने त्याचा मोबाईल नंबर ऍड केला. एवढच नाहीतर युट्युबला उषा वारगडा नावाचा असणारा चॅनेल देखील हटवून s1mple या नावाने नवीन चॅनेल तयार केला गेला आहे. हॅकरच सध्या स्थितीमधील ठिकाण हे अमेरिका देशातला दिसत आहे. शिवाय त्या हॅकरने उषाताई वारगडा यांचे असणारे सर्व गाणी डिलिट केले. आणि त्या अकॉउंटवर गेम खेळणाऱ्या व्हिडिओ दिसू लागल्या.

मात्र, उषा वारगडा यांचा युट्युब चॅनेल हाताळणारा मावस भाऊ कैलास मेंगाळ आणि मच्छिंद्र वाघ यांनी गुगल, युट्यूबला रिकवरीसाठी ट्विटरवरून ई-मेल केला. काही तासाने ईमेल रिप्लाय आला, परंतु ईमेल आय.डी. रिकवर झाला नाही. नंतर उषाताई वारगडा यांचा ईमेल चा दुरुपयोग होऊ नये, म्हणून ईमेल डिसाब्लेड करण्यासाठी पुन्हा ईमेल केला. थोडया वेळाने त्या ईमेल आय.डी.वर डिसाब्लेड केल्याचा ईमेल आला. या घटनेची हकीकत सामाजिक कार्यकर्ते गणपत वारगडा, उषा वारगडा हे वरिष्ठ पोलीस निरीक्षक पनवेल येथे जाऊन पोलीस उपनिरीक्षक विष्णू टोणे यांना सांगितले. उषा गणपत वारगडा या सामाजिक कार्यकर्त्या असून त्या मालडुंगे ग्रामपंचायतीच्या सदस्या देखील आहेत. त्यामुळे ईमेल आय.डी.चा दुरुपयोग होऊ नये म्हणून आदिवासी गायिका उषा गणपत वारगडा हिने हॅकरच्या विरोधात शुक्रवार (दि. २८ फेब्रु. २५) रोजी लेखी तक्रार दाखल केली आहे.

# मातृतीर्थावर आयोजित बहुचर्चित बहुजन साहित्य संमेलनाचे उदघाटन भारत सरकारचे केंद्रीय मंत्री खा. मा. प्रतापराव जाधव यांचे हस्ते

**दैनिक युवक आधार**

**बुलढाणा वार्ताहर** : सर्वदूर ख्याती प्राप्त बहुजन साहित्य संघ, चिखली, जिल्हा बुलढाणा च्या वतीने, मातृतीर्थ अर्थात मा जिजाऊ यांची माहेर नगरी सिंदखेडराजा येथे दि. ३१ मार्च, २०२५ रोजी आयोजित राज्यस्तरीय सहाव्या बहुजन साहित्य संमेलनाच्या उदघाटनाची जबाबदारी भारत सरकारच्या केंद्रीय मंत्रालयातील आयुष मंत्री मा. प्रतापराव जाधव यांनी आवर्जून स्विकारली असून ब. सा. संघाचे अध्यक्ष तथा ज्येष्ठ साहित्यिक कवी कलावंत आणि समर्पित सामाजिक सेवेसाठी सातासमुद्रापारची मानद डॉक्टरेट प्राप्त डॉ. विजयकुमार कस्तुरे, अडव्होकेट, चिखली, उपाध्यक्ष तथा ज्येष्ठ साहित्यिक कवी आणि आपल्या परकायाप्रवेशी कथाकथनासाठी साऊथवेस्टर्न अमेरिकन विद्यापीठाकडून मानद डॉक्टरेट प्राप्त डॉ. बबनराव महामुने, छ. संभाजीनगर, यांच्या सह सामाजिक व मानवीय सेवाभावी कार्यास्तव अमेरिकेतील विद्यापीठाकडून मानद डॉक्टरेट पदवीने सन्मानित, ब. सा. संघाचे सचिव डॉ. डी.व्ही. खरात, चिखली, ब. सा. सं. चे सल्लागार तथा संपादक, प्रा. भास्कर इंगळे, बुलढाणा आणि ग्रामीण भागातील मौजे बोरगाव काकडे, ता. चिखली येथील भावकवी म्हणून प्रसिद्ध असलेले तथा ब. सा. सं. चे सह संघटक आयुष्मान अंकुश पडघान यांनी त्या संबंधीचे हार्दिक निमंत्रण पत्र आज दि. २८-०२-२०२५ रोजी मा. मंत्री महोदय बुलढाणा येथे आले असता, जिल्हाधिकारी कार्यालयातील त्यांच्या विशेष कक्षामधे, त्यांना दिले. आणि मा. मंत्री महोदयांनी सुध्दा अत्यंत आनंदाने सदर निमंत्रणाचा स्विकार करून सहर्ष, मातृतीर्थावर संपन्न होत असलेल्या उपरोक्त बहुजन साहित्य संमेलनाच्या उदघाटनासाठी आवर्जून उपस्थित राहण्याचे मनःपूर्वक आश्वासन दिले.



# मराठी भाषा ही भारतीय संस्कृती व संस्कार जोपासणारी भाषा — प्रा.शिवाली माने देशमुख



**दैनिक युवक आधार**

**सणसर । विकास क्षत्रिय** : मराठी भाषा ही भारतीय संस्कृती व संस्कार जोपासणारी भाषा आहे असे प्रतिपादन प्रा.शिवाली माने देशमुख यांनी केले.भवानीनगर येथील दिनांक 27 फेब्रुवारी 2025 रोजी "मराठी राजभाषा दिनानिमित्त"ग्रंथदिंडी व बाल साहित्य संमेलन संपन्न झाले. यावेळी ते बोलत होते. याप्रसंगी ग्रंथदिंडीचे उद्घाटन प्राचार्या शिवाली माने देशमुख यांच्या हस्ते भारतमातेचे व ज्येष्ठ साहित्यिक कुसुमाग्रज यांच्या प्रतिमेचे पूजन तसेच पालखीतील ग्रंथराज ज्ञानेश्वरी व भगवतगीतेचे पूजन करून करण्यात आले. यावेळी प्रमुख म्हणुन कार्यालयीन अधीक्षक सुशील निंबाळकर आदी उपस्थित होते.यावेळी उपस्थित सर्व मान्यवरांचे महाविद्यालया तर्फे मराठी पुस्तके भेट देवून सत्कार करण्यात आला.यावेळी मराठी राजभाषा दिनानिमित्त निघालेली ग्रंथदिंडी भवानीमाता मंदिर,व्यापार पेठ,छत्रपती शिवाजी महाराज पुतळा येथून महाविद्यालयामध्ये समारोप करण्यात आला.यामध्ये सर्व विद्यार्थ्यांनी महाराष्ट्रीयन वेशभूषा,(मुलांनी–नेहरु–पायजमा,फेटा,धोतर,टोपी,व मुलींनी साडी–चोळी,नाकात नथ,महाराष्ट्रीयन स्त्री) छ.शिवाजी महाराज,संत तुकाराम,वारकरी,महात्मा फुले, शेतकरी,वासुदेव,सावित्रीबाई फुले,झाशीची राणी,अहिल्याबाई होळकर यांच्या अतिशय सुंदर वेशभुषा करून तसेच "संत महतांची वाणी–माय मराठीची गाऊ गाणी,मराठी ज्ञानाची घागर–करु मराठीचा जागर,मराठी राजभाषा गौरव दिन"असे फलक हातात धरून ग्रंथदिडीमध्ये महाराष्ट्र गीत म्हणत सहभागी झाले होते.या ग्रंथदिंडीत सहभागी सर्व विध्यार्थी यांना बिस्कीट देवून खाऊ वाटप करण्यात आले.या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मराठी विभाग प्रमुख प्रा. तुषार दूरगुडे यांनी केले तर आभार प्रा.प्रणाली होरणे यांनी मानले.या कार्यक्रमासाठी महाविद्यालया मधील सर्व विद्यार्थी,शिक्षक,कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी जगताप मॅडम,लांडगे सर,चव्हाण सर,काळभोर सर,अंकिता थोरात मॅडम,पूजा भोईटे मॅडम,हर्षदा वानखेडे, केंगार मॅडम,रणसिंग मॅडम,काटे मॅडम, अदिंनी परिश्रम घेतले.

# लोक हितासाठी धडपडणारा घाटंजीचा युवा उद्योजक गजानन

**दैनिक युवक आधार**

**घाटंजी तालुका प्रतिनिधी - महेश पेंन्दोर**

**घाटंजी**: या समाजात जगण्याकरिता समाजाच काही देण घेणं आवश्यक असते. समाज आपल्याला काय देते त्या पेक्षा आपण समाजाला काय दिले पाहिजेत?या विचारांनिशी समाजासाठी जगणारा समजदूत व युवा उद्धोजक गजाननजी ढवळे हे व्यक्तिमत्व आहे.समाजातील कुठलाही दिनदुबळा आपली कैफियत घेऊन ढवळे यांच्या कडे गेला तर ते फुल नाही फुलांची पाखळी एवढी मदत नेहमीच करतात परंतु आज पर्यंत हा चेहरा प्रकाशझोताते यावा म्हणून दैनिक आधार गजानन भाऊच्या प्रामाणिकतेने समाजासाठी केलेले कार्य या वर्ते च्या माध्यमातून सतत प्रयन्त करत असतातसंत तुकडोजी महाराजाच्या ग्रामगिते प्रमाणे

**माती का ये ढेला बनकर**
**इस जग मै तु आया था**
**खाली हात आया था बंदे**
**खाली हात जायेंगे...**



या व्याख्या प्रमाणेचं गजाननभाऊच कार्य आहे माणूस या जगात स्वाहाचे नाव देखिल घेऊन येत नाही. परंतु या ईश्वराने आपल्यास जन्म दिला त्याचे सार्थक व्हायला पाहिजेत. म्हणून अश्या कित्येक दुःखी पीडिताना गजानन यांनी मदत केली परंतु त्या केलेल्या मदतीचा कधीच ओहा पोवा होणं दिला नाही. प्रत्येक धर्माच्या ग्रंथा प्रमाणे उजव्या हाताने केलेली मदत डाव्या हाताला त्याची नसलेली माहिती या प्रमाणेच गजानन यांचे कार्य आहे. परंतु गजानन यांनी समाजासाठी आपण करत आलेली मदत व त्यांचा गाजा वाजा न कर्ता इतरांच्या चेहऱ्यावरचे हास्य गजानन यांना आनंद देत असतो.

==============

# दोन दिवसीय मंडळ अधिकारी व ग्राम महसुल अधिकारी यांची प्रशिक्षण कार्यशाळा

**दैनिक युवक आधार**

**नवीन पनवेल वार्ताहर** : राज्य शासनाच्या 100 दिवसाच्या कृती कार्यक्रमा अंतर्गत रायगड जिल्हा प्रशासनाच्या वतीने दोन दिवसीय मंडळ अधिकारी व ग्राम महसुल अधिकारी यांचे करीता रिलायन्स इंडस्ट्रिज, बेणसे, पेण जि.रायगड येथे प्रशिक्षण कार्यशाळा संपन्न झाली

ग्राम स्तरावर काम करत असतांना कामामध्ये सुसूत्रता येण्यासाठी विषयज्ञान आवश्यक असते. यामुळे नागरीकांना आपण चांगल्या प्रकारे सुविधा देऊ शकतो. ग्राम स्तरावर आता मोठया प्रमाणात तंत्रज्ञानाचा वापर होत असतांना सबंधित कर्मचारी देखील हे तेवढेच तंत्रस्नेही असणे आवश्यक असणार आहे. नुकतेच राज्य शासनाने एआय तंत्रज्ञानाचा वापर करून अधिकअधिक सेवा देण्याचा मानस दर्शविलेला आहे. तसेच हे सर्व काम करताना मुळ कायदयाचा ज्ञान देखील तेवढेच महत्वाचे आहे. याच अनुषगाने जिल्हाभरातील सर्व ग्राम महसूल अधिकारी व मंडळ अधिकारी यांना रामदास जगताप (उपजिल्हाधिकारी, पुणे), संजय कूंडेटकर (उपजिल्हाधिकारी से.न.) यांचे मार्गदर्शन लाभले. तसेच संगणकीय कामकाजाबाबत कृष्णा पास्ते, सुधारक गिऱ्हे यांनी सविस्तर माहिती देण्यात आली. या प्रशिक्षणासाठी जिल्हाधिकारी किशन जावळे, संदेश शिर्के (निवासी उप जिल्हाधिकारी ), श्रीराम पवार उपविभागीय अधिकारी पेण, तहसिलदार शेवाळे, नायब तहसिलदार महसूल नितीन परदेशी, तुषार कामत यांनी उपस्थिती दर्शवली. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन शशिकांत सानप, मंडळ अधिकारी पळस्पे तर कार्यक्रमाचे समारोप वल्लभ मस्के (अध्यक्ष रायगड जिल्हा तलाठी संघ) यांनी केले.

===============



# छत्रपती शिवरायांबद्दल गरळ ओकणाऱ्या कोरटकर विरोधात लिंबागणेशकरांचे जोडे मारो आंदोलन

## तातडीने अटक करून कठोर कारवाई करण्यात यावी. :- डॉ.गणेश ढवळे

**दैनिक युवक आधार**

**पाटोदा (प्रतिनिधी)** : रयतेचे राजे छत्रपती शिवाजी महाराज, छत्रपती संभाजी महाराज, राजमाता जिजाऊ यांच्या बद्दल आक्षेपार्ह व बदनामीकारक वक्तव्य करून शिव प्रेमींच्या भावना दुखावणाऱ्या नागपुरच्या प्रशांत कोरटकर यांना तात्काळ अटक करून त्यांच्या वर देशद्रोहाचा गुन्हा दाखल करण्यात यावा. या साठी सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांच्या नेतृत्वाखाली दिनांक ०१मार्च२०२५ शनिवार रोजी सकाळी ११:०० वाजता लिंबागणेश येथील छत्रपती शिवाजी महाराज चौकात जोरदार घोषणाबाजी करत प्रशांत कोरटकर यांच्या प्रतिमेला जोडे मारून निषेध व्यक्त करण्यात आला. ईतिहास संशोधक इंद्रजित सावंत यांना मोबाईल वरून धमकी देताना प्रशांत कोरटकर यांने महाराष्ट्राची अस्मिता असलेले रयतेचे राजे छत्रपती शिवाजी महाराज, छत्रपती संभाजी महाराज व राजमाता जिजाऊ यांच्या बद्दल हिनकस वक्तव्य केले असुन दोन समाजात तेढ निर्माण करण्याचा प्रयत्न देखील केला आहे. तसेच विकृत लेखक जेम्स लेन यांनी छत्रपती शिवाजी महाराज व राजमाता जिजाऊ यांच्या बद्दल अत्यंत विकृत लिखाणाचे समर्थन करून तमाम शिवप्रेमींच्या भावना दुखावल्या आहेत.



मराठा समाजाला शिविगाळ करून समाजामध्ये तेढ निर्माण करण्याचा प्रयत्न केला आहे. तसेच ईतिहास संशोधक इंद्रजित सावंत यांना जीवे मारण्याची धमकी दिली आहे. महाराष्ट्र राज्याच्या मुख्यमंत्र्याचे नाव घेऊन सदर व्यक्तीने हे वक्तव्य करत धमकी दिल्यामुळे हे प्रकरण अत्यंत संवेदनशील असुन तातडीने कठोर कारवाई करण्यात यावी. अशी मागणी मुख्यमंत्री तथा गृहमंत्री देवेंद्रजी फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथजी शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार यांना जिल्हाधिकारी, पोलिस अधीक्षक बीड यांच्या मार्फत करण्यात आली आहे. या वेळी आंदोलनात राजेभाऊ आप्पा गिरे, सरपंच बालासाहेब जाधव, सेवा सोसायटी चेअरमन रविंद्र निर्मळ, सार्वजनिक शिवजयंती उत्सव समिती अध्यक्ष अशोक वाणी, विक्रांत वाणी, अँड.गणेश वाणी, बाळकृष्ण थोरात, भगवान मोरे, लक्ष्मण वाणी, भालचंद्र गिरे, दादा गायकवाड, नामदेव वाणी, सौरभ जाधव, रत्नाकर वाणी, संजय पावले, अशोक जाधव, पांडुरंग कानडे, कृष्णा कानडे, हनुमंत निर्मळ सह आदी सहभागी झाले होते.

# पत्रकार भीमराव धुळप श्री संत शिरोमणी रोहिदास महाराज पुरस्काराने सन्मानित

**दैनिक युवक आधार**

**मुंबई (शांताराम गुडेकर )** : मौजे घोगाव,तालुका कराड येथील श्री संत रोहिदास मित्र मंडळाच्या वतीने सालाबाद प्रमाणे यावर्षी सुद्धा श्री संत रोहिदास छत्रपती शिवाजी महाराज आणि डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांची संयुक्त जयंती आनंदोत्सव साजरा करण्यात आला. मंडळाचे यंदाचे दहावे वर्ष होते. यावेळी समाजासाठी बहुमौल्य योगदान देणाऱ्या समाज बांधवांचा श्री संत शिरोमणी रोहिदास महाराज समाज रत्न पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. या पुरस्कार सोहळ्यामध्ये धगधगती मुंबईचे संपादक आणि पत्रकार भीमराव धुळप यांच्यासह काही समाज बांधवांचा समावेश होता. या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून सिनेअभिनेते अभिजित कदम,शिवसेना (उबाठा) गटाचे माहीम विधानसभा क्षेत्राचे निरीक्षक यशवंत विचले,कराड मलकापूर नगरपरिषदेचे नगरसेवक वसीम मुल्ला, समाजसेवक दयानंद पाटील,मंडळाचे अध्यक्ष सुभाष धुळप यांच्यासह इतर मान्यवर उपस्थित होते.सदर कार्यक्रम मौजे घोगाव ता.कराड येथे संपन्न झाला.श्री. भीमराव धुळप यांच्या सामाजिक,शैक्षणिक कार्याची दखल घेऊन या अगोदर देखील पत्रकार धुळप यांना आजपर्यंत २१ राज्यस्तरीय पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे. हा स्वतःच्या गावच्या समाजाने दिलेला श्री संत शिरोमणी रोहिदास महाराज समाज रत्न पुरस्कार मिळाल्याबद्दल श्री धुळप यांनी मंडळाचे आभार मानले आहेत. या कार्यक्रमाला घोगाव गावचे सरपंच,उपसरपंच, प्रतिष्ठित व्यक्ती शंकर हरी पाटील,महादेव भेदाटे,नारायण साळुंखे,ग्रामसेवक शिवाजी जाधव यांच्यासह इतर मान्यवर उपस्थित होते.यावेळी माजी प्राचार्य वसंत धुळप, प्रा. जालिंदर धुळप,आरोग्यसेविका सौ लीला जालिंदर धुळप,शिक्षिका नीता महेंद्र धुळप, प्रवीण धुळप,प्रदीप धुळप,दिलीप धुळप यांच्यासह अनेक मान्यवरांचा सन्मान करण्यात आला.



**आजपर्यंत माझ्या सामाजिक आणि शैक्षणिक कार्याची दखल घेऊन मला विविध संस्थांनी आतापर्यंत २१ राज्यस्तरीय पुरस्काराने सन्मानित केले आहे. मात्र माझ्या समाजाने श्री संत रोहिदास मित्र मंडळाने केलेला सन्मान हा बहुमूल्य असा आहे.माझ्या मातीत माझ्या जन्मगावी माझ्या समाज बांधवांनी केलेला सन्मान हा मला इतर पुरस्कारापेक्षा मोठा असल्याचे वाटते,सदर पुरस्कार मी माझी आई कै. बाळकाबाई हिंदुराव धुळप हिला समर्पित करत आहे.**

# घाटंजी नगर परिषद निविदा प्रक्रियेत ऑनलाईन प्रणालीचा वापर टाळून पारदर्शकतेला तडा? दोषींवर कारवाई न झाल्यास आंदोलनाचा इशारा!

**दैनिक युवक आधार**

**घाटंजी तालुका प्रतिनिधी । महेश पेंन्दोर** : घाटंजी नगर परिषदेमध्ये विविध विकासकामांसाठी निविदा प्रक्रिया पार पाडली जाते. आजच्या डिजिटल युगात केंद्र व राज्य सरकारच्या निर्देशांनुसार निविदा प्रक्रिया ऑनलाईन पद्धतीने व पारदर्शक मार्गाने होणे अपेक्षित आहे. मात्र, घाटंजी नगर परिषदेमध्ये या नियमांचे सर्रास उल्लंघन होत असून, निविदा प्रक्रिया मनमानी पद्धतीने पार पडत असल्याचे धक्कादायक चित्र समोर आले आहे.

**निविदा प्रक्रियेत अपारदर्शकता का?**

घाटंजी नगर परिषदेकडून दिनांक २५/०२/२०२४ रोजी प्रसिद्ध केलेल्या निविदा प्रक्रियेसंदर्भात अनेक महत्त्वाचे प्रश्न उपस्थित होतात. संबंधित निविदा केवळ काही मोजक्या लोकांच्या फायद्यासाठी राबवली गेल्याचा संशय उपस्थित होत आहे.

**नगर परिषदेने पारदर्शक ऑनलाइन निविदा प्रक्रियेचा अवलंब का केला नाही?**

**ऑनलाईन निविदा प्रक्रियेस स्थगिती देऊन ऑफलाईन पद्धतीने निविदा मंजूर करण्यामागे नेमके कोणते हेतू आहेत?**

**या प्रक्रियेमध्ये कोणत्या अधिकाऱ्यांची भूमिका संशयास्पद आहे?**

**सर्वसामान्य ठेकेदारांना संधी न देता ठराविक गटांनाच लाभ मिळावा, असा प्रयत्न का केला गेला?**

**ठराविक गटांना फायदा करून देण्याचा डाव?**

स्थानिक प्रशासनातील भ्रष्टाचार आणि मनमानी कारभारामुळे अनेक प्रकल्प ठराविक लोकांच्या ताब्यात जात आहेत. शहरातील विकासकामांसाठी मिळणारा निधी योग्य प्रकारे वाटला जात आहे का, यावरही मोठा प्रश्न निर्माण होतो.

**मुख्याधिकाऱ्यांची तातडीने बदली न झाल्यास तीव्र आंदोलनाचा इशारा!**

यासंबंधी श्री. निखिल राजेंद्र देठे यांनी जिल्हाधिकाऱ्यांकडे लेखी तक्रार दाखल केली असून, संबंधित मुख्याधिकारी व जबाबदार अधिकाऱ्यांची तातडीने बदली करावी, अशी मागणी करण्यात आली आहे. जर या प्रकरणाची सखोल चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई झाली नाही, तर घाटंजी नगर परिषदेतील भ्रष्ट कारभाराविरोधात जिल्हाधिकारी कार्यालयासमोर तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा स्पष्ट इशारा देण्यात आला आहे.

**प्रशासन ठोस पावले उचलणार का? की आंदोलन अपरिहार्य?**

नगर परिषदेच्या या प्रकारावर वरिष्ठ प्रशासन काय कारवाई करणार? अपारदर्शक प्रक्रिया तातडीने रद्द करून नवीन, पारदर्शक निविदा प्रक्रिया राबवली जाणार का? दोषींवर कठोर कारवाई होणार का? **मुख्याधिकाऱ्यांची बदली केली जाणार का?**

जर प्रशासनाने तातडीने निर्णय घेतला नाही, तर लोकशाही मार्गाने मोठे आंदोलन उभे करण्यात येईल!




# करंजारोड अंबेनगर येथील एका रात्रीत चार घरे फोडली

## दिवसा टेहळणी रात्री घरफोडी। चोरांनी उरणकरांची झोप उडवली

**दैनिक युवक आधार**

**तृप्ती भोईर उरण। प्रतिनिधी** : उरण शहराचे वाढते औद्योगिकरण , महत्त्वाचे प्लांट वाढती वस्ती, त्यामुळे रोजगार व नोकरी निमित्ताने परप्रांतीयाचे लोंढे, त्यात आता सुरू झालेली रेल्वे सेवा, सिडकोने स्थापित केलेल्या द्रोणागिरी नोड वसाहती. या सर्वांचा परिणाम अपघात, महिलांवरील अत्याचार गुन्हेगारी, खुन, चोरी यांचे वाढते प्रमाण होय.गेल्या वर्षभरात तर उरण तालुक्यातील खुन, चोरी सारख्या गुन्ह्यात अधिकच भर पडली आहे. दिनांक २९ डिसेंबर २०२४ रोजी उरण करंजा रोडवरील अंबेनगर येथील वसाहती मध्ये एका रात्रीत चार बंद घरांची घरफोडी झाली आहे. घनश्याम भोईर, केशव म्हात्रे, संजय पाटील, व ग्रेटा पॉल या रहिवासीयांच्या चार घरांची घरफोडी झाली आहे. या घरफोडी मध्ये घराच्या दरवाजाचा कोंयडा कापून कपाटाचे लॉक फोडून मौल्यवान वस्तूंचा शोध घेण्यात आला पण घरात कुणी रहात नसल्याने चोरांच्या हाती फारसे काही लागले नाही पण संजय पाटील यांच्या घरातील मौल्यवान वस्तू मधील सोन्याची चैन व मंगळसूत्र चोरांनी चोरून नेले आहे. तसेच ग्रेटा पॉल यांच्या घरातील चार पाच हजार रोकड चोरट्यांनी लंपास केली आहे. चोरटे सिसिटिव्ही मधे कैद झाले आहेत. उरण पोलीस स्टेशनला गुन्ह्याची एफ आय आर ०४१२ या क्रमांकाने नोंदविली आहे.पण आज दोन महिन्यांचा कालावधी उलटून गेला आहे, तरीही पोलिसांच्या हाती गुन्हेगार लागले नाहीत.चोरटे दिवसा बंद असलेल्या, कुलूप असलेल्या घरांची टेहळणी करतात आणि रात्री हातसफाई करत आहेत. यातील बऱ्याच गुन्हेगारांच्या मुसक्या पोलिसांनी आवळल्या आहेत पण तरीही पोलिसांना अपेक्षित असे यश येत नसल्याचे दिसून येत आहे.

गेल्या आठवड्याभरापुर्वी वशेणी गावातील कुलुपांची घरे फोडून चोरटे पसार झाले आहेत.या चोरट्यांनी नागरिकांची झोप उडवली आहे. अत्याधुनिक सीसीटीव्ही बसवले आहेत, पोलिसांची गस्तही सुरू असते तरीही चोरीच्या घटना घडत आहेत सीसीटीव्ही आणि रात्रीची ग्रस्त असूनही चोरटे कुठून येतात आणि कुठे जातात याचे कोडे काही उलगडत नाही .गुन्हेगार पोलिसांना सहजासहजी हाती लागत नाहीत. त्यामुळे घरफोडींच्या गुन्ह्यांची उकल होण्याचे प्रमाण कमी आहे. सीसीटीव्हीचे जाळे असतानाही बेधडक येऊन गुन्हे करून जाणाऱ्या गुन्हेगारांकडून पोलिसांना एक प्रकारचे आवाहन दिले जात असल्याचे संकेत मिळत आहेत.गुन्हेगार अजुनही मिळाले नाहीत याचे कारण कोणतेही असो पण यामध्ये चोरी झालेल्या रहिवासीयांचा काय दोष पण शिक्षा मात्र त्यांनाच मिळत आहे. चोर मात्र अजूनही उजळ माथ्याने फिरत आहेत.



# विज्ञान शाखेतील विद्यार्थ्यांना देशात व परदेशात नोकरी व संशोधनासाठी अनेक संधी

**दैनिक युवक आधार**

**निफाड प्रतिनिधी राहुल कुलकर्णी** : निफाड येथील मराठा विद्या प्रसारक समाजाचे क.ग. दा. मोरे महाविद्यालय, निफाड येथे *राष्ट्रीय विज्ञान दिवस* कार्यक्रम संपन्न झाला. या प्रसंगी प्रमुख अतिथी म्हणून ज्येष्ठ शास्त्रज्ञ डॉ. प्रभाकर जाधव (शास्त्रज्ञ, कॅलिफोर्निया,USA) उपस्थित होते. विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना ते म्हणाले कला, वाणिज्य व विज्ञान शाखेतील विद्यार्थ्यांना देशात व परदेशात आपल्या ज्ञानाच्या जोरावर विविध नोकरीच्या व संशोधनाच्या संधी मिळवता येतील. विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना त्यांनी आपल्या छोट्याशा कसबे सुकेणे या गावापासून ते यु.एस.ए. पर्यंतचा आपला प्रवास विद्यार्थ्यांपुढे मांडला. शासनाच्या विविध शिष्यवृत्तीचा फायदा घेऊन परदेशात उच्च शिक्षणाच्या संधी साधता येतील असेही त्यांनी सांगितले. हुशार, कौशल्य संपन्न, कर्तव्यदक्ष व मेहनती मुलांची जगाला गरज आहे असे त्यांनी प्रकर्षाने सांगितले. याप्रसंगी विद्यार्थ्यांनी पोस्टर प्रेसेंटेशन व रांगोळी स्पर्धेत सहभाग सहभाग घेऊन विज्ञान विषयक दृष्टिकोन या माध्यमातून सादर केला. उपस्थित मान्यवरांनी रांगोळी व पोस्टर ची पाहणी केली. या कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून महाविद्यालयाचे प्राचार्य प्रोफे. (डॉ) सुरेशजी जाधव हे उपस्थित होते. अध्यक्षीय मनोगतात माननीय प्राचार्यांनी विद्यार्थ्यांना विज्ञान विषयक दृष्टिकोन जागृत ठेवून निरीक्षण करावे व त्याचा उपयोग येणाऱ्या काळात संशोधनात करावा असे आव्हान केले.कार्यक्रमाचे प्रास्ताविक सकाळ सत्र प्रमुख प्रा.वाय.डी. कडलग यांनी केले. पाहुण्यांचा परिचय प्रा.बी.बी. मुन्तोडे यांनी केला कार्यक्रमासाठी आय. क्यू. ए. सी. समन्वयक डॉ. एल. जे. सुसान सकाळ सत्र प्रमुख डॉ. पी. डी. ढेपले. महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, प्राध्यापकेतर कर्मचारी व मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्रीमती पी.सी. खापरे यांनी केले व आभार प्रदर्शन श्रीमती एम. बी. बोराडे यांनी केले.




**मार्गदर्शन करताना शास्त्रज्ञ डॉ. प्रभाकर जाधव, व्यासपीठावर प्राचार्य प्रोफे. (डॉ.) सुरेश जाधव व मान्यवर...**

# तहसिलदारांनी संवेदनशीलता दाखवत वृद्धेच्या शेवटच्या प्रवासासाठीचा मार्ग केला सुकर

**दैनिक युवक आधार**

**निफाड तालुका प्रतिनिधी । राजेश भडांगे । कोळगाव** :- माणूस मेल्यानंतरही इहलोकीचा प्रवास करतांना त्याला मार्ग मिळू नये, यासारखी दुर्दैवी गोष्ट कोणती? अशीच हृदय पिळवटून टाकणारी घटना कोळगाव ता.निफाड येथे घडली. एका वयोवृद्ध महिलेच्या अंत्यसंस्कारासाठी कुटुंबियांना संघर्ष करावा लागला. रस्त्याच्या अंतर्गत वादामुळे महिलेच्या पार्थिवाला अंत्यसंस्कारासाठी स्मशानभूमीकडे नेण्यासाठी मार्गच नव्हता. मात्र, निफाडचे तहसिलदार विशाल नाईकवाडे यांनी संवेदनशीलता दाखवत वृद्धेच्या शेवटच्या प्रवासासाठीचा मार्ग सुकर केला.

कोळगाव येथील माजी सरपंच ज्ञानेश्वर यशवंत घोटेकर यांच्या ८० वर्षीय मातोश्री गं.भा. चंद्रभागा यशवंत घोटेकर यांना देवाज्ञा झाली. मात्र, नातेवाईकांना त्यांच्या घरी जाण्यासाठी आणि मृतदेह अंत्यसंस्कारासाठी स्मशानभूमीकडे नेण्यासाठी रस्ता नव्हता. हा रस्ता गेल्या कित्येक वर्षांपासून अंतर्गत हेव्यादाव्यांमुळे वादात अडकलेला आहे. त्यामुळे रस्त्याभावी अंत्यसंस्कार कसे करायचे? या विवंचनेत घोटेकर कुटुंबीय होते. त्यांनी निफाडचे तहसिलदार विशाल नाईकवाडे यांना भ्रमणध्वनी वरून परिस्थिती कथन केली. परिस्थितीची जाणीव होताच, तहसिलदारांनी तातडीने देवगावचे मंडळ अधिकारी ज्ञानेश्वर पगार, तलाठी विठ्ठल पोटरे, पुरुषोत्तम निकम, अमोल चव्हाण यांचे पथक घटनास्थळी पाठवले. तेथे रात्री १ वाजेपर्यंत प्रशासनाची बैठक झाली. यावेळी तहसिलदार सातत्याने पथकाच्या संपर्कात होते. भूमी अभिलेख कर्मचारी उपस्थित नसल्याने रस्त्याबाबत ठोस निर्णय घेता येत नव्हता. त्यामुळे त्यांनी ग्रामस्थ आणि प्रतिवादी यांच्याशी चर्चा करत शेतातून अंत्ययात्रा जाऊन द्यावी अशी विनंती केली. त्याच्या विनंतीला मान देऊन वादी नरहरी घोटेकर यांनी शेतातुन अंत्ययात्रा जाण्यास परवानगी दिल्याने तात्पुरता मार्ग काढण्यात आला व दि.२८ फेब्रु.रोजी सकाळी १० वाजता अंत्यसंस्कार विधी पार पडला. प्रशासनाच्या वेगवान निर्णयामुळे एका कुटुंबाची तगमग संपली. गावकऱ्यांनी तहसीलदार नाईकवाडे यांच्या संवेदनशील आणि त्वरित निर्णय क्षमतेचे कौतुक केले. तहसिलदार यांनी माणुसकीच्या नात्याने घेतलेल्या निर्णयामुळे व संवेदनशील अधिकाऱ्यांमुळेच समाज अजूनही उभा आहे हे या घटनेमुळे सिद्द झाले.

**काय आहे रस्त्याचा वाद?**

पूर्वी कोळगाव – रुई हा शिवरस्ता अस्तित्वात होता. मात्र नजीकच्या साहेबराव दगु घोटेकर व नरहरी दगु घोटेकर यांनी शासकीय मोजणी केल्यानंतर तो त्यांच्या हद्दीत आल्याचे सांगण्यात येते. त्यामुळे त्यांनी तो अधिग्रहित केला आहे. मात्र त्यामुळे सध्या शिवरस्ता वापरणाऱ्या शेतकऱ्यांची गैरसोय झाली असून यावर महसूल खात्याने कायमस्वरूपी तोडगा काढावा अशी मागणी ग्रामस्थांनी केली आहे.

